भाराक्रांत वाटसरूंसाठी

ख्रिस्ताची तळमळ

भागलेल्या भूमीवर आपल्या गौरवी वाटेवर

असलेल्या वाटसरूंना आत्मिक चिंतनासाठी

लेखक: ऑक्टेव्हियस विन्स्लो   (१८०८ - १८७८)

अनुवाद: क्रॉसी उर्टेकर

अनुक्रमणिका

	पृष्ठ
अतिखोल, विस्तीर्ण महासागर	५
निश्चिंत टेका	५
न्यायाची धगधगती तलवार येशूच्या प्रेमळ ऱ्हदयात शमली	६
अतिखोल, विस्तीर्ण व अक्षय	८
प्रेमळ दु:खसहन, रक्तसिंचन व मरण	९
तो मी आहे	९
येशूची वैयक्तिक आकर्षणे	१०
पित्याचा हस्त	११
तुमच्यासाठी	१३
एका रंगवलेल्या स्वप्नाप्रमाणे जीवन	१४
एक कीटक अशा माझ्यासाठी	१५
येशूचे अश्रू	१६
मग ही भये का?	१७
ख्रिस्ताचा आपल्या लोकांवर जागता पहारा	१८
त्याच्याकडे आपले अंत:करण घेऊन जा	१९
वधस्तंभामधून जगाकडे पाहाणे	२०
तुमचे क्लेश माझ्याकडे घेऊन या	२२
हे दैवी रहस्य!	२३
माझ्यासारख्या, एका कवडीमोल दरिद्री पाप्यासाठी	२४
देवाने आपला क्रोध आपल्या पुत्रावर सैल सोडला	२४
किती उत्तेजनदायी सत्य!	२६

तुमची सध्याची आपत्ती	२७
जीवनातील क्षुल्लक गोष्टी	३०
प्रेमळ कृपाळू व उदार पिता	३१
निरनिराळे सर्व व्यवहार	३१
या येशूला ओळखणे !	३२
जीवाला समाधान देणारे दृश्य	३३
एकच सर्वांगसुंदर	३३
तुमच्या अभ्यासाचे प्रमुख उद्दिष्ट	३४
सहज गाठण्याजोगे मोलवान स्थळ	३५
केवढी हे रिक्त होणे, नम्रता व मानहानी	३६
जेव्हा त्याचे सौंदर्य दिसते	३८
तुमचा सर्वसमर्थ मित्र	३८
अचंबित व स्तंभित करणारी प्रीती	४०
कारण त्याने तिच्यावर प्रीती केली	४०
येशूच्या उराशी	४१
त्याच्या प्रीतीचे एकच उद्दिष्ट	४१
ख्रिस्तच सर्वस्व असायला हवा	४२
तो मित्र	४२
जणु असे कधी घडलेच नाही	४३
स्वर्ग आहे तरी काय?	४४

भाराक्रांत वाटसरूंसाठी ख्रिस्ताची तळमळ

अनुवाद: क्रॉसी उर्टेकर

पहिली मराठी आवृत्ती: २०१७

© Copyright 1998 Chapel Library. Printed in the USA. Permission is expressly granted to reproduce this material by any means, provided

1. You do not charge beyond a nominal sum for cost of duplication;
2. This copyright notice and all the text on this page are included.

Chapel Library is a faith ministry that relies entirely upon God's faithfulness. We therefore do not solicit donations, but we gratefully receive support from those who freely desire to give. Chapel Library does not necessarily agree with all the doctrinal positions of the authors it publishes.

Worldwide, please download material without charge from our website, or contact the international distributor as listed there for your country. In North America, for additional copies of this booklet or other Christ-centered materials from prior centuries, please contact CHAPEL LIBRARY 2603 West Wright Street Pensacola, Florida 32505 USA.

Phone: (850) 438-6666 • Fax: (850) 438-0227
Email: chapel@mountzion.org www. ChapelLibrary.org

Translated and Published by Love Maharashtra with permission from Chapel Library US

लव्ह महाराष्ट्र

१७७२ भीमपुरा गल्ली क्र. २३,

बाबाजान चौक, पुणे - ४११००१.

महाराष्ट्र

दुरध्वनी: ०२०-२६३४०५५३

ईमेल: lovemaharashtra@gmail.com

वेबसाईट: www.lovemaharashtra.org

भाराक्रांत वाटसरूंसाठी ख्रिस्ताची तळमळ

विस्तीर्ण, अतिखोल महासागर

सार्वकालिक प्रीतीने येशूचे अंत:करण असे हेलावले की त्याने पृथ्वीसाठी स्वर्गाचा — वधस्तंभासाठी मुकुटाचा त्याग केला; आपला स्वभाव धारण करण्यासाठी वैभवी वस्त्रांचा त्याग केला; आपल्या पापाचा महारोग स्वत:वर घेतला. ख्रिस्ताची ही किती अमर्याद प्रीती! केवढा विस्तीर्ण, अतिखोल महासागर! ज्यांच्या शृंखला त्याने विरघळवल्या, ज्यांची अंधारकोठडी खुली केली, ज्यांना स्वातंत्र्य प्रदान केले, अशा खंडणी मिळालेल्या प्रभूच्या लोकांना विचारा. त्याच्यासारखी अशी प्रीती कोणीही कधीच केली नाही!

खंडणीच्या मोलाविषयी तर आपण काय बोलावे? अति मोलवान व श्रीमंत अशी ही गोष्ट केवळ स्वर्गच देऊ शकत होता. त्याने स्वत:लाच देऊन टाकले! यापेक्षा अधिक तो काय करू शकत होता? त्याने स्वत:लाच दिले: शरीर जीव व आत्मा. त्याने आपले परिश्रम, आपले रक्त, आपले जीवन, आपले सर्वस्व दिले, आपल्या खंडणीचे मोल म्हणून दिले. खंडणीची किंमत मोजली. मग पित्याने उगारलेल्या हाताचा तडाखा आपल्या उरावर झेलला, त्याच्या ऱ्हदयाचे उष्ण, जीवनी रक्त आपल्या तारणाचे मोल म्हणून भरून दिले!

किती विस्तीर्ण, अतिखोल हा महासागर! एवढे हे एवढे तीव्र, प्रत्यक्ष घडलेले प्रभावी अद्भुत सत्य, आदर्शभूत घटना आपल्याला इतकी धूसर कशी दिसते? काय ही आपल्या स्वभावाची उदासीनता व भ्रष्टता! काय ही आपल्या अधम अंत:करणाची खोल भ्रष्टता! ख्रिस्ताच्या रक्ताचे थेंब आपले अंत:करण हेलावून टाकू शकत नाहीत? अधिक स्वर्गीय जीवनासाठी त्याची ही मृत पावणारी प्रीती आपल्याला गळ घालत नाही?

निश्चिंत टेका

> *"तू आपला भार परमेश्वरावर टाक म्हणजे*
> *तो तुझा पाठिंबा होईल." — स्तोत्र ५५:२२*

आपल्या चिंता व काळज्या, आपली दु:खे व गरजा अगदी साध्यासरळ विश्वासाने प्रार्थनापूर्वक प्रभूवर टाकण्याची ही कृती आहे. येशू आमंत्रण देत आहे की या, त्याच्यावर टेका, साऱ्या विश्वाला आधार देऊन समतोल राखणाऱ्या त्याच्या पराक्रमी बाहूंवर शक्तिनिशी टेका. त्या सैनिकाच्या भाल्याने भळभळलेल्या त्याच्या कुशीवर टेका! पण शंका येऊन तुम्ही विचाराल, "प्रभू माझ्यासाठी हे करू शकेल का?" तुमचे ओझे तुमच्या नाजूक आत्म्याचा चुराडा करून धुळीस मिळवत असताना ज्याविषयी शंका घ्यायला यत्किंचितही जागा नाही अशा मुद्द्यावर तुम्ही वाद घालत आहात. आणि येशू तर हा सारा वेळ तुमच्या बाजूला उभा राहून प्रेमाने म्हणत आहे, "तू आपला भार माझ्यावर टाक म्हणजे मी तुझा पाठिंबा होईन. मी सर्वसमर्थ देव आहे. मी तुझ्या पाप व दोषाचा भार काल्वरीच्या चढावरून वाहून नेला तेव्हा ज्या पराक्रमी सामर्थ्याने व बलशाली प्रीतीने ती सर्व वाहून नेली त्याच सामर्थ्याने तुझ्या गरजा व दु:खे वाहण्यास तो तयार आहे. माझ्यावर ती लोटून दे!"

"माझ्या लाडक्या मुला! माझ्यावर निश्चिंत टेक! तुझ्या या चिंतांचे दडपण मला जाणवू दे. बाळा, मी तुझे ओझे जाणून आहे! मीच त्याला आकार दिला — खुद्द माझ्या हाताने ते झेलले आणि तुला कसलीही मदत नसल्याने त्या ओझ्याची विभागणी करून वाटणी केली नाही. कारण मी ते उचलत असताना मी म्हणालो ही व्यक्ती माझ्यावर टेकत असता मी ह्या व्यक्तिजवळ राहीन, तिचे ओझे माझे होईल, तिचे राहणार नाही. अशा प्रकारे माझ्या बाळाला मी माझ्याच प्रेमळ हातांचा विळखा घालून माझ्या बाहूत घेईन. येथे ते खाली टाक! जगाची सर्व राज्ये हाती धरणाऱ्याच्या खांद्यावर ते ठेवायला भिऊ नको! आणखी जवळ ये! तू पुरेसा जवळ आलेला नाहीस! मी तुझ्या ओझ्याला अलिंगन देईन म्हणजे माझ्या बाळाला माझ्या उरावर विसावता येईल. माझ्यावर प्रेम करतोस! मला ठाऊक आहे. मग शंका बाळगू नको. तर माझ्यावर प्रेम करत बेलाशक टेक!"

न्यायाची धगधगती तलवार येशूच्या पवित्र प्रेमळ उरात शमली

देवाच्या पावित्र्याचे हे महत्त्वपूर्ण व भयानक प्रात्यक्षिक विश्वाने कधी पाहिले नव्हते. कशाहीपेक्षा श्रेष्ठ व अमर्याद दुरावा असणारे त्याच्या प्रिय व एकुलत्या एक पुत्राचे दु:खसहन व मरण! एक प्रकारे

कालवरीवरील वधस्तंभ देवाला पापाविषयी असणारा द्वेष व त्यासाठीचे शासन प्रदर्शित करतो. देवाच्या क्रोधाच्या झाडूने लक्षावधी पृथ्वींचा या विश्वावरून संपूर्ण नायनाट केला असताही ते शक्य झाले नसते. "त्याने स्वत: तुमची आमची पापे स्वदेहाने वाहून खांबावर नेली" (१ पेत्र. २:२४).

पाहा, देवाला पापाविषयी असणाऱ्या तिरस्काराचे हे भयानक प्रदर्शन! मंडळीची सुरक्षितता, रदबदली व तारणारा म्हणून तिचे पाप पाहता *देवाचा क्रोध मोजमाप न करता ख्रिस्तावर ओतण्यात आला!* आपल्या लोकांची पापे पाहता ती त्याने आपल्या पुत्रावर लादली. त्यांच्या अपराधास्तव आपल्या पुत्राच्या पवित्र जिवावर त्याच्या क्रोधाच्या सर्व कुप्या त्याने रित्या केल्या! हे माझ्या जिवा, कालवरीकडे जा आणि देव किती पवित्र आहे तर पाप किती श्वापदी आहे, आणि अधिकार, गांभीर्य व पावित्र्याने युक्त असा यहोवा पापी व्यक्तीला किंवा बदलीचे स्थान घेऊन जामीन राहिलेल्या व्यक्तीला कसे शासन करतो ते जाणून घे. त्या क्षणी *न्यायाची ती दैवी,जळती व तळपती तलवार त्या टेकडीवर देवाच्या पुत्राच्या पवित्र ऱ्हदयात खुपसली जात असताना* कधी नव्हे इतका तो पुत्र पित्याला अधिक प्रिय वाटला होता.

देवाचा तो क्रोध त्याच्या लाडक्या प्रिय पुत्राविरुद्ध नव्हता, तर त्याच्या मंडळीसाठी बदलीचा यज्ञ व अर्पण करण्यासाठी तो वधस्तंभावर स्वत:ला सादर करताना तेथे गाठ पडलेल्या पापाविरुद्ध होता — आपल्यासाठी तेथे त्याने स्वत:ला दिले. जेव्हा देवदुतांनी ती न्यायाची तळपती तलवार येशूच्या पवित्र व प्रेमळ उरात शमताना पाहिली तेव्हा त्यांच्या मनात पापाच्या प्रचंड अधमतेची नवी संकल्पना साकार झाली असेल! आणि दैदीप्यमान प्रकाश झोतात देवाची पाप्यावरील अद्भुत प्रीती दिसली! माणसाचे पाप आणि देवाची प्रीती — एकीकडे अवर्णनीय अतिदुष्टता तर दुसरीकडे अमाप विशालता — कुठेही पाहायला मिळणार नाही असे दृश्य ख्रिस्ताच्या वधस्तंभात प्रदर्शित झाले. या दोन महान प्रयोगांची सत्ये आपण किती शिकली पाहजेत — पापाचा अमर्याद तिरस्कार आणि प्रीतीचे अमर्याद पावित्र्य — आपल्या पुत्राला मरण्यासाठी देऊन टाकण्यातील देवाची प्रीती, मरण्यातील ख्रिस्ताची प्रीती, पापाची अघोर असह्य व अत्यंत नीचता, ज्यामुळे इतका दैवी, इतका पवित्र व इतका मोलवान यज्ञ होणे

अपरिहार्य होते!

अतिखोल विस्तीर्ण व अक्षय

ख्रिस्ताची प्रीती अद्भुत आहे. स्वर्गातील सिंहासनापासून खोल पृथ्वीवर जी सोन्याची साखळी सोडण्यात आली त्यात जोडणारा पहिला व सार्वकालिक घटक प्रीती हा होता. ख्रिस्ताने आपल्यावर प्रीती करावी ही त्या अद्भुततेची सुरुवात होती. जेव्हा त्या प्रीतीचे आकलन करण्याचा आपण प्रयत्न करतो — तिचे मोजमाप करण्याचा, खोली मापण्याचा, आराखडा काढण्याचा — तेव्हा आपल्याला कळून येते की तिची उंची आपण गाठू शकत नाही, तिच्या खोलीचा अंदाज लागत नाही, तिची लांबी रुंदी मापता येत नाही. अशी प्रीती, अशी दैवी प्रीती, अशी अमर्याद प्रीती, अशी सार्वकालिक प्रीती, अशी तारणारी, मरणारी प्रीती, म्हणजे एक महासागर आहे ज्याच्या लाटांची मंद लहर देवाकडून व स्वर्गातून हे प्रत्येक आश्चर्य आपल्या पतित जगात घेऊन येते.

येशूने आपल्यासारख्यांवर प्रीती करावी — आपण पापी असताना प्रीती करावी — आपण कसे होतो हे माहीत असून आणि आपण आपल्याला कसे सिद्ध करू याची कल्पना असूनही त्याने आपले अंत:करण आपल्यासारख्यांवर लावावे, आपल्याला निवडावे, आपल्यासाठी मरण पावावे, आपल्याला पाचारण करावे, आणि अखेर आपल्याला गौरवात न्यावे — *अशी ही प्रीती खरोखर अजबच*! अहो पापाने भारलेल्यांनो, या प्रीतीच्या विस्तीर्ण, अतिखोल सागरात झोकून देऊन बुडी मारा! तो तुमची सर्व पापे अच्छादून टाकील, तुमचे सर्व अपराध पुसून टाकील; तुमच्या सर्व अयोग्यतेला त्याचाच पूर धुवून नेईल, आणि त्याच्या सोनेरी लाटांवर तरंगत हळुवार लहरीवरून सार्वकालिक आशीर्वादित किनाऱ्यावर तुम्हाला अलगद घेऊन जाईल!

तुमच्या सारख्याला ख्रिस्ताने एवढा मनापासून का जीव लावावा असा विचार तुमच्या मनाला कितीदा शिवला? आणि हे देखील आश्चर्यच नाही का की तुम्ही इतके चंचल व पुन्हा पुन्हा कुमार्गाकडे वळणारे, थंड, परत परत मूळपदावर येणारे, असे असतानाही देवाची तुमच्यावरील ही प्रीती थंडावली नाही की बदलली नाही? पण

एवढ्यावरच विसावू नका, ख्रिस्ताच्या अद्भुत प्रीतीच्या सध्याच्या अनुभवावरच समाधान मानू नका. ती अतिशय महान व स्तंभित करणारी आहे. हा प्रीतीचा महासागर इतका अतिखोल, विस्तीर्ण व अक्षय आहे की तुम्ही तुमचे सर्व अधर्म, पापे, दु:खे यांसह त्याच्या पूर्णतेत "किती खोल आहे" असे म्हणत बुडी मारा. विहीर खोल आहे. प्रियांनो मनमुराद पाणी प्या!

प्रीतीचे दु:खसहन, रक्तसिंचन आणि मरण

ख्रिस्ताची प्रीती! किती मोलाचा विषय! त्याविषयी आपण कधी कंटाळून जाऊ का? कधीच नाही! तिची महानता आपल्याला कधी आकलन होईल का? कधीच नाही! तिची संपन्नता आपण कधी साठवून ठेऊ शकू का? तिची खोली कधी मापू शकणार नाही, की तिच्या परिमितीचे मोजमाप करू शकणार नाही. ती सर्व ज्ञानाच्या पलीकडची आहे. येशूने आपल्या लोकांसाठी जे सर्व केले ते हेच की त्याने आपली प्रीती उलगडून व्यक्त केली.

बेथलेहेमच्या वाटेने फेरफटका मारताना मला *ती प्रीती देहधारी झालेली* दिसते. सत्कर्मे करीत जाणाऱ्या त्याच्या पावलांचा मागोवा घेताना मला *प्रीतीचे परिश्रम* करणारे पाय दिसतात. बेथानीच्या घराला भेट देताना त्या *प्रीतीची सहनुभूती* दिसते. लाजाराच्या कबरेपाशी उभे असता मला ती *प्रीती रडताना* दिसते. गेथशेमानेच्या उदासवाण्या अंगणात प्रवेश करताना मला ती *प्रीती शोक करताना* दिसते. कालवरीच्या वाटेने जाताना मला ती *प्रीती दु:खसहन, रक्तसिंचन करताना, मरताना* दिसते. त्याच्या संपूर्ण जीवनाचे दृश्य म्हणजे केवळ खोल, मूक करणारी आणि मुक्तीच्या प्रीतीचे मोलवान रहस्य उलगडणारी खोल प्रीती होय!

तो मी आहे

"धीर धरा, मी आहे, भिऊ नका." — मार्क ६ :५०

तर ऐका, वादळात येशूच्या वाणीकडे कान द्या. तुझ्या ठायी मीच वादळ उठवले आहे, आणि मीच त्यावर नियंत्रण ठेवणार आहे. तुझ्यावर संकट पाठवणारा मी आहे, आणि त्यामध्ये मी तुझ्यासोबत राहणार आहे. भट्टीची आग भडकवणारा मी आहे. ज्वालांवर माझी

देखरेख असणार आहे, आणि मीच त्यातून तुला बाहेर काढणार आहे. तुझे ओझे घडवणारा मी आहे. तुझा वधस्तंभ मी कोरला आहे, आणि तो वाहण्यास मी तुला सामर्थ्य पुरवणार आहे. तुझा दु:खमिश्रित प्याला मीच तयार केला, आणि तुझ्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेच्या लीनपणे अधीन राहून तो प्राशन करायला मीच तुला शक्ती देणार. जगिक मालमत्ता मीच तुझ्याकडून हिरावून घेतली, तुझे मूल, तुझ्या उराशी टेकणारी तुझी पत्नी, तुझा तरुणपणचा पती, यांच्यासाठी मीच तुला शोकग्रस्त केले. तुझा पती, पत्नी किंवा मूल यांच्यापेक्षा मी तुझ्यासाठी अमर्याद उत्तम असणार. हे सर्व काही मीच घडवून आणले.

मेघांना मी आपले रथ बनवतो. मी पोषाखाप्रमाणे वादळ पांघरतो. रात्रीच्या वेळी, काळोखात मी येतो. उसळत्या लाटांच्या पाऊलवाटेवरून मी चालतो. धीर धर, तो मी आहे. भिऊ नको, तो मी आहे — तुझा मित्र, तुझा तारणारा, तुझा बंधू! तुझ्या जीवनातील प्रत्येक परिस्थितीला मीच कारण आहे. ते सर्व मी तुझ्या कल्याणार्थच करतो. तुझ्यावर हल्ला करायला मीच शत्रूंना परवानगी दिली. निंदानालस्तीचा भडिमार तुझ्यावर होऊ दिला. निर्दयतेने तुला घायाळ होऊ दिले. गरजांचे दडपण आणले. तुझी विपत्ती भूमीतून उफाळून वर आली नाही तर ती वरून खाली आली — स्वर्गातून — तेजोमय दुताच्या रूपात आशीर्वाद घेऊन काळाकभिन्न झगा पांघरून आली.

हे सर्व मी प्रीतीने पाठवले. हा आजार मरणासाठी नाही, तर देवाच्या गौरवासाठी आहे. हे दु:ख सतत तुला मान तुकवून खाली भूमीकडे पाहायला लावणार नाही. तुझ्या जीवनाचे हे औदासीन्याचे वस्त्र कधी बदलणार नाही असे नाही. मीच हे आज्ञापिले, घडवून आणले व नियंत्रणाखाली ठेवले. प्रत्येक वादळी वाऱ्यात, प्रत्येक काळोख्या रात्रीत प्रत्येक एकटेपणाच्या घटकेत, प्रत्येक वाढत्या भयात येशूची वाणी असे बोलत असल्याचे कानी येईल की "आनंद कर; हा मी आहे, भिऊ नको."

येशूची वैयक्तिक आकर्षणे

येशूची प्रीती आपल्याला जिंकून घेते. त्याचे गौरव आपल्याला मोहित करते. त्याचे सौंदर्य आपल्याला आकर्षून घेते. त्याची सहानुभूती आपल्याला सुखद वाटते. त्याची कोमलता आपल्याला नमवून

शांत करते. त्याचा विश्वासूपणा आपल्याला प्रेरणा देतो. तो सर्वांगसुंदर आहे. येशू सर्वस्वी मायाळूपणे प्रीती करणारा आहे. येशू मसलत देण्यात सर्वस्वी सुज्ञ आहे. तो सर्वस्वी धीराचा व दयाळू आहे. येशू मैत्रीत सर्वस्वी विश्वासू आहे. येशू सुखद, मुलायम व रोग निवारणारा आहे. येशूचे अंत:करण त्याच्या मुलांसाठी कायम प्रीतीने ओथंबलेले असते. येशूची सततची हजेरी आपल्या मुलांसाठी सतत दयेची असते. येशूचा स्वभाव आपल्या मुलांसाठी सतत सहानुभूती दर्शवतो.

येशू तुमचा भाऊ, तुमचा मित्र, तुमचा तारणारा आहे. विपत्तीत सापडलेल्या आपल्या बांधवांच्या गरजा तो जाणतो. *मित्र म्हणून* तो तुमच्याशी मित्रत्वाने वागतो. *तारणारा म्हणून* त्याने तुमचा जीव पाप व नरकापासून वाचवला आहे. तुमच्यासाठी स्वर्गाचा ताबा घ्यायला तो स्वर्गी उच्चस्थानी चढला, आणि तुमच्यासाठी जागा तयार करत आहे. याजकाच्या उरपटावरील मोलवान खड्याप्रमाणे तो तुमचे नाव आपल्या ऱ्हदयावर धारण करतो. तुमच्या दिवसाचा एकही क्षण असा नाही, तुमच्या जीवनातील एकही घटना अशी नाही, रोजची ऐतिहासिक परिस्थिती अशी नाही, तुमची एकही बौद्धिक किंवा आत्मिक भावना अशी नाही, की त्याच्या प्रीतीने त्यामध्ये तुम्हाला वाहिले नाही व त्या ख्रिस्ताने तुमच्यासाठी आठवणीने सतत मध्यस्थी केली नाही. येशूची ही वैयक्तिक आकर्षणे सर्वांना निमंत्रित करणारी व ज्यांचा धिक्कार करता येत नाही अशी आहेत.

पित्याचा हस्त

"माझे सर्व दिवस तुझ्या हाती आहेत." — स्तोत्र ३१:१५

आपले विपत्तींचे दिवस देखील देवाच्या हातात असतात. जसा उजळून टाकणारा प्रत्येक सूर्यकिरण, तसाच काळोख दाटून आणणारा प्रत्येक ढग हा देवापासून येतो. आपल्या या भूतलावरील परिस्थितीला केव्हाही अचानक प्रचंड कलाटणी मिळू शकते. आनंदापाठोपाठ दु:ख तर भरभराटी शेजारी विपत्ती नेहमी असतेच. आज आपण कळसावर असू तर उद्या त्याच्या तळाशी असू. एक क्षण किंवा एक घटना केवढा मोठा बदल घडवून आणू शकतात. पण प्रियांनो, ते सर्व प्रभूपासून येते. संकटे मातीतून निपजत नाहीत की क्लेश जमीनीतून उगवत नाहीत. देवाने

पाचारण केल्याशिवाय दु:ख येत नाही. आपल्या सार्वभौमत्वाने देवाने परवानगी दिल्याखेरीज — आरोग्य ढासळत नाही, संपत्ती नाहीशी होत नाही, सौख्य विनाश पावत नाही, मैत्री थंडावत नाही, की प्रिय जनांची प्रीती लोप पावत नाही. तुमच्या दु:खाचा समय त्याने नेमलेला असतो. या वर्षी देवाला संतोषवणारा जो कटू प्याला तुम्हाला प्यावा लागणार आहे तो कोणा मानवी हाताने बनवलेला नसणार. तो प्याला प्रभूच्या हातात आहे. तुम्ही आपल्या ऱ्हदयाशी एखादी गोष्ट जतन केली असेल, तर तो ती सोडून द्यायला सांगेल. आता काही आशीर्वाद तुम्ही उपभोगत असाल , त्याचा तो तुम्हाला त्याग करायला लावील. तुमच्या काही प्रिय अपेक्षा तुम्ही ऱ्हदयाशी बाळगल्या असतील तर त्या कदाचित तो तुम्हाला सोडून द्यायला सांगेल. एखाद्या वेळी त्याने तयार केलेली एकाकी वाट तो तुम्हाला तुडवायला लावील.

होय, तो तुम्हाला सर्व बाजूंनी दु:खी करील, तरीही ते सारे सारे काही त्याच्या हातात असेल. त्याच्या हाती! पित्याच्या हाती, त्या दाट काळोखात प्रत्येक घटनेला तोच आकार देत असेल आणि तुमच्या जीवनाचा प्रत्येक तपशील तोच आखत असेल. रोगाने तुम्हाला दु:खाच्या बिछान्याशी खिळले आहे का? शोकाने तुमच्या डेऱ्यात काळोखी दाटली आहे का? विपत्तींनी तुमची सर्व साधनसंपत्ती भिकेस लावली आहे का? बदलामुळे तुमची सुखे कमी झाली आहेत का? दु:खाने अनेक रूपांनी येऊन तुमचा आत्मा धुळीस मिळवला आहे का? प्रभूने हे घडवले आहे. जे काही तुमच्यावर गुदरले आहे, जे काही तुमचे रद्द केले आहे, आणि जे काही तुमच्यापासून आवरून धरले आहे — ते सर्व त्याच्या अदृश्य हातांनी चाहुलही लागू न देता आणले आहे.

अरे हो! त्याच्या न बदलणाऱ्या प्रीतीचा हस्त प्रत्येक कटुता ढवळून काढून त्यातून गोडवा निपजवतो — प्रत्येक घनदाट मेघावर तेजस्वी मेघधनुष्य रेखाटतो — चुकणारे प्रत्येक पाऊल तो सांभाळतो — त्याच्या ओंजळीत आसरा देतो — अचुक कुशलतेने तो मार्गदर्शन करतो, त्याच्या निवडलेल्या लोकांना सार्वकालिक गौरवासाठी सुरक्षित राखतो. देवाच्या प्रिय मुला, तुझी संकटे, तुझे क्लेश, तुझ्या हानी, तुझे वधस्तंभ, तुझी दु:खे, सर्व, सर्व, तुझ्या स्वर्गीय पित्याच्या हाती आहे, आणि त्याने पाठवल्या खेरीज ते काहीही तुझ्यावर गुदरत नाही. त्या

घायाळ ऱ्हदयापुढे मान तुकव — त्या वादळात घुसळून निघालेला तुझा आत्मा त्याच्या शांत, सार्वभौम व्यवस्थेला व नीतिमान वर्चस्वाला अधीनतेने शरण जाऊ दे. दुख:सहन करणाऱ्या तुझ्या तारणाऱ्याचे बोल आहेत, "हे पित्या, माझ्या इच्छेप्रमाणे नको — तर तुझ्या इच्छेप्रमाणे होवो. माझ्या दु:खाचे व अतिक्लेशाचे समय तुझ्या हाती आहेत." प्रियांनो, सर्व काही पित्याच्या हाती आहे. ते समय कोणतेही असोत — परीक्षेचे समय, कसोटीचे, मोहपरीक्षांचे समय, दु:खसहनाचे समय, संकटांचे समय, उजळून टाकणारे किंवा खिन्न करणारे समय, जीवन किंवा मरणाचे समय असोत, ते तुमच्या पित्याच्या हातात आहेत. काही आशीर्वादांच्या गोड आठवणींचे, किंवा तुमच्या अंत:करणाला शिस्त लावताना झालेल्या यातनांचे श्रेय प्रभूलाच जाते ना? जसे त्याने आपल्या संपत्तीचे भांडार खोलून त्यातील अतिमोलवान बक्षीसे तुमच्या चरणाशी ओतावीत तसे पित्याच्या परिपूर्ण प्रीतीतून ते झऱ्याप्रमाणे उफाळून बाहेर येतात. आपले सर्व दिवस आपल्या तारणाऱ्याच्या हाती आहेत. त्याच तारणाऱ्याने आपली दु:खे त्याच्या ऱ्हदयात वागवली, आपले शाप व पाप त्याच्या जिवाने सोसले, आपला वधस्तंभ त्याच्या खांद्यावर घेतला, तो मरण पावला, तो पुनरुत्थित झाला, आणि आता तो आपल्यासाठी मध्यस्थी करत जिवंत आहे, आणि तोच आपल्या खंडून घेतलेल्यांना गौरवाने गोळा करणार आहे, तोच तुमचा पालनकर्ता व मार्गदर्शक आहे. *जे हात अजूनही खिळ्यांचे व्रण धारण करून आहेत, त्याच हातात तुमचे सर्व समय आहेत.*

तुमच्यासाठी

येशू तुमच्या अंत:करणाला मोलाचा वाटतो का? तुमच्या हर्षाचे व स्तुती प्रशंसेचे उद्दिष्ट तोच आहे का? त्याच्यासाठीची तुमची प्रीती उत्स्फूर्त आहे का? तुम्ही येशूवर प्रीती करता का? ख्रिस्तावरील प्रीतीची मशाल तुम्ही कालवरीच्या वेदीवर पेटवा. तुम्ही तेथे जा आणि येशूची तुमच्यावरील प्रीती काय आहे ते जाणून घ्या व विश्वास ठेवा — त्या प्रीतीची विशालता, त्या प्रीतीचे स्वार्थत्यागाचे यज्ञार्पण; ख्रिस्ताच्या त्या प्रीतीने कसे परिश्रम केले व आक्रोश केला, रक्तसिंचन, दु:खसहन केले, आणि तुमच्यासाठी मरण पावला! या प्रीतीसमोर उभे राहण्याचे तुम्हाला धाडस होईल का? इतकी मोलवान ही प्रीती, किती

महान, किती सहनशील, किती स्वत:ला भस्म करणारी, किती न बदलणारी, आणि हे लक्षात घ्या की हे अर्पण तुमच्यासाठी होते — हा वधस्तंभ तुमच्यासाठी होता — तुमच्यासाठी या यातना होत्या — तुमच्यासाठी ही निंदा व अपमान — तुमच्यासाठी हे मरण — आणि तुम्हाला त्याबद्दल काहीच संवेदन नाहीत, भावना नाहीत, येशूसाठी प्रीतीही नाही? हे अशक्य आहे!

निराश होऊ नका, व्यर्थ वाईट वाटून घेऊ नका की तुमची ख्रिस्तावरील प्रीती किती दुर्बल, किती चंचल, किती संशयखोर आहे. जा, आणि या वास्तवतेवर आणि तारणाऱ्याच्या महान प्रीतीवर चिंतन करा आणि जर प्रीतीने प्रीतीला प्रेरणा दिली तर तुम्ही चिंतन करत असताना आग भडकेल, आणि तुमचा जीव देवाच्या प्रीतीच्या ज्वालांनी वेढलेला असेल.

एका रंगवलेल्या स्वप्नाप्रमाणे जीवन

" हा देव आमचा सनातन देव आहे;
तो सर्वकाळ आमचा मार्गदर्शक होईल." — स्तोत्र ४८:१४

जग नाहीसे होत आहे. या भूतलावरील सध्याचे सारे काही बदलत आहे.

स्वप्नवत रंगीत हे जीवन;
जणु ग्रीष्मातला खळखळता झरा;
निखळत्या ताऱ्याचा किरण;
हेमंतातला लहानसा दिवस;
उसासा देते चंचल झुळुक;
जणु मरणारी विझती ज्योत;
होती नेत्रदीपक प्रकाशित;
झाली धूसर शाश्वतात.

खरी एकी नसलेले बंधन, कोळ्याचे जाळे, रेशमाचा धागा, धूसर होत जाणाऱ्या सावल्या ही सर्व रूपके स्पष्टपणे सध्याच्या जगाच्या अवस्थेला तंतोतंत लागू होणारी आहेत. ज्या घरात आपल्या बालपणी आपण आसऱ्याला असतो ते आपण सोडतो. ज्या भूमीने आपल्याला जन्म दिला ती आपण सोडतो. ज्या प्रिय जनांसोबत आपण

एका चुलीपाशी वावरलेले असतो ते मरण पावतात. बालपणच्या मित्रमंडळीपासून आपली ताटातूट होते. जे जग एकेकाळी अल्हादकारक सूर्यप्रकाशात होते व त्यातील जीवन सुखकर होते, ते आता काळ्या ढगांनी झाकळून गेले आहे आणि कटू झाले आहे — अस्तित्वाचे सर्व दृश्य हिवाळी औदास्याच्या वातावरणात रूपांतरित झाले आहे. जीवनाच्या उलथापालथीचे परिणाम इतके खेदजनक व खिन्न करणारे आहेत.

पण हे सारे असे असतानाही "हा आपला देव सदासर्वकाळ आहे!" अस्तित्वात असलेले सर्व बदलते पण देव बदलत नाही. सर्व वस्तू बदलतात पण स्वर्ग बदलत नाही. परिभ्रमणानुसार कालभ्रमण होत राहते, भूतलावरील घटना पुढे सरकत राहतात, पण ज्याच्यावर ते आधारलेले आहे व जो सर्व घटनांना आकार देतो व त्यावर नियंत्रण ठेवतो, तो ढळत नाही. "कारण मीच तो देव आहे जो बदलत नाही." आपल्या कारभारात फेरफार होतील. आपली परिस्थिती बदलेल. आपले गणगोत व मित्रपरिवार एकेक करून सोडून जातील. आपला जीव एका दिवसात अनेक आध्यात्मिक भावनांच्या चढउतारातून जातो. पण ज्याने आपल्याला त्याचे स्वत:चे होण्यासाठी निवडले आहे व ज्याने या क्षणापर्यंत आपल्याला त्याच्या सान्निध्यात ठेवले आहे, तो आपला कराराचा देव व पिता सदासर्वकाळ आहे, आणि तो आपल्याला कधीच सोडणार नाही व टाकणार नाही. "कारण आमचा हा देव सार्वकालिक आहे: तो मरेपर्यंत आपल्याला मार्गदर्शन करील."

एक कीटक, अशा माझ्यासाठी

किती महान सत्य आहे हे! देवाचा पुत्र पापासाठी स्वत:चेच यज्ञार्पण करतो! ज्याला पाप ठाऊक नव्हते — जो पवित्र, निरुपद्रवी व निष्कलंक आहे — अधर्माचा विचारही त्याच्या मनात नाही, तरीही तो पाप झाला किंवा पापार्पण झाला! किती महत्त्वपूर्ण विचार! जर देवाने स्वत: हे घोषित केले नसते व देवदुतांनी कितीही पुकारून जाहीर केले असते तरी आपण मुळीच विश्वास ठेवला नसता.

किती हा धन्य व स्तुतीस पात्र इम्मानुएल! तुझ्या या तीव्र व रहस्यमय दु:खसहनाचा हाच का शेवट होता? तू आज्ञापालन करायचे, पाप

वाहायचे, शाप सहन करायचा, आणि शिर लववून मरायचे, यासाठी की मला मुक्ती मिळावी? हे सारे माझ्यासाठी व माझ्या बदली का केले? किती ही आदर्श प्रीती! केवढी ही अमर्याद, मोफत कृपा! की देवाने मानवधारी व्हावे — की जो पवित्र त्याने स्वत: पाप धारण करावे, जणू आपणच गुन्हेगार असल्याप्रमाणे कठोर न्याय होऊ द्यावा — की त्याने क्रोधाचा प्याला पिऊन रिता करावा, फटके देणाऱ्यांपुढे आपली पाठ करावी, लज्जा सहन करावी, थुंकी झेलावी, आणि अखेर त्या वधस्तंभावर लोंबकळावे, आणि आपल्या रक्ताच्या अखेरच्या थेंबापर्यंत ते ओतावे — आणि हे सर्व माझ्यासाठी! माझ्यासारख्या या बंडखोरासाठी! माझ्यासारख्या या कीटकासाठी! पापी लोकांमध्ये मुख्य असलेल्या या पाप्यासाठी! आकाशांनो, स्तंभित व्हा! अगे पृथ्वी अचंबित हो! अशी अजब प्रीती कधी पाहिली का?

येशूचे अश्रू

"येशू रडला." — योहान ११:३५.

बायबलमध्ये नोंदले गेलेले हे अद्भुत शब्द आहेत. ते ऱ्हदयाला स्पर्शून जाणारे, अतिशय मृदू व लक्षणीय शब्द असून त्याच्या संपूर्ण जीवनातील ही अर्थपूर्ण घटना आहे. "येशू रडला" — भावनातिशयाने रडला. सहानुभूतीने रडला. ख्रिस्ताच्या प्रीतीचे याहून सांत्वनपर, सुखद दृश्य कोणते आहे? *ही कळवळ्याची, सहानुभूतीची, शोक करणारी प्रीती!*

ख्रिस्ताची सहानुभूती कधी थकत नाही की डुलकी घेत नाही. ती कधी थंडावत नाही की विसरत नाही. आपल्या प्रत्येक वधस्तंभाला ती लपेटलेली असते — आपल्या प्रत्येक ओझ्याला ती बांधलेली असते — चकाकत्या प्रकाशाने ती प्रत्येक घनदाट ढग अच्छादून टाकते. अच्छादून टाकणारी ही काल्पनिक भावना नसते, रोगट सहानुभूती अगर शृंगार नसतो. ते देवमानवी वास्तव असते. *ती मानवधारी झालेल्या देवाची सहानुभूतीदायी प्रीती असते!*

तुम्ही विश्वासाने, आपले दु:ख घेऊन ख्रिस्ताच्या वास्तव सहानुभूतीवर बेलाशक टेकून निवांत व्हा. अहाहा, किती पवित्र व मोलवान अश्रु आहेत या दैवी प्रीतीचे — येशूचे अश्रू! ख्रिस्ताच्या सहानुभूतीने

दिलासा देऊन सांभाळ करणारे. आपण पित्याने सिद्ध केलेला प्याला नम्रपणे सहज पिऊ या — आपल्याला सर्व प्रकारच्या सहानुभूतीची चव घेणे परवडेल, एकांती जाऊन दु:खाने आपण शोक करू — पण गुदमरून टाकणाऱ्या नि:शब्द शांततेतील काळोख्या बिछान्यात दुर्बल होऊन पडलेले असताना, पुरलेल्या प्रेमाच्या कबरेपाशी येशूच आपल्याला सहानुभूती देत असतो.

हे संकटग्रस्ता, वादळात हिंदकळलेल्या पण सांत्वन न पावलेल्या, पवित्र आत्म्याचा हा सांत्वनदायी प्याला धिक्कारू नकोस. तो सांत्वनदाता आहे, तो देईल — प्रभू व तारणाऱ्या या बंधूची सहानुभूती तुला विपत्काली समाधान देईल. त्याच्या न धिक्कारणाऱ्या प्रीतीला तू शरण जा, तो आपल्या चरणाशी तुला जवळ ओढील, तुझे मुसमुसून आक्रोश करणारे अंत:करण त्याच्या उराशी निवांत करून तुला विसावा देईल.

मग ही भये का?

येशूपाशी सार्वकालिक कराराचा सारा खजिनाच आहे, देवत्वाची सारी परिपूर्णता, विश्वाला जतन करण्यातील त्याची सारी साधनसामग्री त्याच्या ताब्यात आहे. आकाशातील तारकांकडे पाहा — येशूने त्याच्या जडजवाहिऱ्याने ते अच्छादले आहे. नेत्रदीपक निसर्ग देखावे पाहा — येशूने आपल्या सौंदर्याचे त्यावर आवरण चढवले आहे. ढगांच्या गडगडाटाने लपेटलेले डोंगर पाहा — येशूने ते निर्माण केले आहेत. त्या सुरेख लिलीकडे पाहा — येशूने तिला रंगांचा साज चढवला आहे. हवेत तरंगणाऱ्या पक्षांकडे पाहा — येशूच त्यांना अन्न पुरवतो.

हाच जो ज्याच्यापाशी बल व सौंदर्य आहे, तो तुझा बंधू आहे. या सर्वांहून तू त्याला अधिक व प्रिय नाहीस का? त्याने तुझ्यावर युगारंभापूर्वीच प्रीती केली व तुला निवडले. त्याच्या रक्ताने तुला खंडून घेतले, व त्याच्या आत्म्याद्वारे तुझ्या ठायी तो वस्ती करतो. मग ही भये का? हा अविश्वास का? तो तुझ्याकडून एकच अपेक्षा करतो की आपले पूर्ण *रितेपण* तू त्याच्याकडे घेऊन जावेस — त्याच्या सहानुभूतीकडे आपले *दु:ख* घेऊन जावेस — त्याच्या अचूक सुज्ञतेकडे आपले *पेच* घेऊन जावेत — आणि तुझ्या *मोहपरीक्षा* व *संकटे* घेऊन त्याच्या

पंखांखाली आश्रय घ्यावा. बालकाप्रमाणे विश्वास घारण करून नम्रपणे त्याच्यापुढे आपला दावा मांड. त्याचे बोल ऐकून घे — "मी तुझा देव प्रभू आहे, मीच तुला मिसर देशातून बाहेर काढले: तू आपले तोंड उघड म्हणजे मी ते भरीन."

ख्रिस्ताचा आपल्या लोकांवर जागता पहारा

ख्रिस्त त्याच्या लोकांवर जागता पहारा देतो हे सत्य किती प्रशंसनीय व प्रिय वाटते! कल्पना करा की तुम्ही अत्यंत खडतर व कठीण वाटेवरून मार्ग शोधत चालला आहात, प्रत्येक पाऊल भीत भीत कष्टाने, मागेपुढे संशयाने पाहात, लक्षपूर्वक टाकत आहात. प्रत्येक क्षणी कोणीतरी अदृश्य अपरिचित व्यक्ती तुमच्या आसपास घुटमळत आहे — प्रत्येक चुकीचे पाऊल तपासत आहे — आणि प्रत्येक साशंकतेच्या पावलापाशी मार्गदर्शन करत आहे — प्रत्येक दु:खावर फुंकर मारत आहे — आणि प्रत्येक गरज पुरवत आहे. सर्व शांत निरामय आहे. कसलाच आवाज ऐकू येत नाही. एक क्षणही दृश्य होत नाही, तरी तुम्हाला आश्चर्य वाटेल अशा प्रकारे अगदी निकडीच्या क्षणी आवश्यक असलेला आधार मिळतो — तो कोठून प्राप्त होतो हे तुम्हाला ठाऊक नाही, कोणाकडून प्राप्त होतो हे देखील तुम्ही जाणत नाही. हे काल्पनिक चित्र नक्कीच नाही.

सुखलोकाच्या यात्रेला निघालेले, गुंतागुंतीच्या खडतर वाटेने जाणारे तुम्ही देवाचे मूल आहात का? प्रत्येक क्षणी येशू तुमच्या जवळ आहे, बहुधा अदृश्य व अनोळखी रूपात. तुमच्यासाठी कृपेने पुरवठा करण्यास विलक्षण स्थान घेतल्याचे पाहून तुम्ही मूक होऊन नवलाने पाहतच राहिला असाल — तुम्हाला कोठून मदत आली याचे कोणतेही दृश्य चिन्ह दृष्टीस पडले नसेल. तुमच्या आसपास पावलांची चाहूल किंवा प्रतिध्वनीही कानावर आला नसेल. तुमच्या वाटेवर भरकन एखादी सावली आडवी आलेली दिसली नसेल. निसर्गनियमात फेरफार होऊन तो अचानक थांबला नसेल, सूर्य थांबून स्थिरावला नसेल, की स्वर्ग उघडला नसेल. तरीही विचित्रपणे प्रभावी मुक्ती मिळाली असेल, ती अनपेक्षित क्षणी मिळाली असेल, तुम्हाला त्या वेळी त्याची निकडीची गरज होती.

तो येशू तुमचा *तारक*, तुमचा *बंधू*, तुमचा *मेंढपाळ* व तुमचा *मार्गदर्शक* होता! तोच तुमच्याभोवती घुटमळत होता — अनोळखी लक्षात येणार नाही असा, तुम्हाला डोळ्यातील बुबुळाप्रमाणे सांभाळत होता, त्याच्या ओंजळीत तुम्हाला आसरा दिला होता. शौर्याने लढा देण्यास तोच तुम्हाला सशस्त्र करत होता — त्यानेच तुमच्या आत्म्यास बळ दिले — विपत्तींच्या दडपणाने तुम्ही पूर्ण भारलेले असता तुमच्या अंत:करणास त्यानेच कृपा पुरवली. तो आपल्या मुलांसाठी आजवर हेच करत आला आहे. ज्या नेत्रांना झोप येत नाही व डुलकीही लागत नाही त्या नेत्रांची तुमच्यावर सतत नजर होती. तुम्हाला कोणत्या प्रकारच्या भट्टीत टाकले आहे याची त्याला पूर्ण कल्पना होती, आणि जेव्हा त्या ज्वाला भयंकर भडकल्या तेव्हा त्या शमवायला तो तेथे हजर होता. त्याने तुमची दुर्बल नौका वादळाशी झगडत असताना पाहिले, आणि वादळाने कळस गाठला तेव्हा तो तुम्हाला वाचवायला धावून आला.

अडचणीच्या व संशयाच्या समयी त्याने स्वत:ला कसे सिद्ध केले! तुमच्या गतकाळात अगदी महत्त्वाच्या क्षणी कितीदा प्रभूने तुम्हाला असे दर्शन दिले! तुमच्या उणीवा दूर केल्या गेल्या — शंका निरसन केले गेले — पेचाच्या समयी तुम्हाला मार्गदर्शन करण्यात आले. मरणातून त्याने तुमचा प्राण वाचवला — अश्रुंपासून नेत्र सांभाळले — पडण्यापासून तुमचे पाय सांभाळले. कधीही अचानक तुम्हाला त्याच्या ऱ्हदयाबाहेर कधीच काढले नाही — की त्याच्या विचारातून तुम्ही कधी फेकून दिले गेला नाही — त्याच्या हातातून — की नेत्रांपासून दुरावले गेला नाही. जा तर मग, आणि ख्रिस्तावर आपला भार टाका.

त्याच्याकडे आपले अंत:करण घेऊन जा

तुमचे दु:ख काय आहे? मरणाच्या हाताने तडाखा दिला का? प्रिय व्यक्ती हिरावली गेली का? तुमच्या नेत्रांना सुख देणारी गोष्ट एका फटक्यात गमावली का? पण हे कोणी केले? *हे येशूने केले आहे*. मरण त्याचा केवळ जासूद होते. तुमच्या येशूने हे केले. प्रभूने हे सारे हिरावून नेले. त्याने काय काढून घेतले? तुमची पत्नी? हो, पण तुमच्या पत्नीठायी असणारी कोमलता येशूठायी पूर्णत्वाने आहे. त्याच्या ऱ्हदयाच्या सागरामधला तिच्या ठायी तर फक्त एक थेंब होता. तुमचा

पती नेला का? दहा पतींहून येशू तुमच्यासाठी उत्तम आहे. तुमचे आईवडील, तुमचे मूल, तुमचा मित्र, जगातील सर्वाधिक आनंद देणारी तुमची प्रिय गोष्ट हिरावली गेली का? हौद फुटला का? मातीचा घडा आदळून त्याच्या ठिकऱ्या झाल्या का? तुमचे सर्व झरे आटलेत का? तरीही येशू पुरेसा आहे. त्याने स्वत:ला तुम्हापासून विभक्त केलेले नाही आणि कधी कधी करणारही नाही.

प्रहारामुळे घायाळ व दु:खी झालेले तुमचे अंत:करण त्याच्याकडे घेऊन जा — आणि त्याच्या ऱ्हदयाशी विसावू द्या; एकेकाळी ते अंत:करणही प्रहाराने घायाळ व दु:खी झाले होते. भग्न ऱ्हदयाला मलमपट्टी कशी करावी, जखमी आत्म्याला आरोग्य कसे द्यावे व शोकग्रस्तांचे सांत्वन कसे करावे हे त्याला चांगले अवगत आहे.

तुमचे दु:ख काय आहे? तुमचे आरोग्य ढासळले आहे का? तुमची मालमत्ता हातची गेली आहे का? तुमचे मित्र तुमच्यावर उलटले आहेत का? तुमच्या परिस्थितीत तुमची कसोटी चालू आहे का? तुमच्या वाटेवर तुम्ही पेचात पडला आहात का? पुरवठा नीट होत नसल्याने सभोवती काळोख पसरला आहे का? संकटकाळ जवळ येत असल्याची तुम्हाला चाहूल लागली आहे का? प्रकाश जवळ नसता तुम्ही अंधारात चालत आहात का? *सरळ येशूकडे जा*. तो सतत खुले असणारे दार आहे — मृदू, प्रेमळ व विश्वासू मित्र सतत जवळ राहणारा. हा बंधू केवळ तुमच्या आपत्तींसाठीच जन्माला आला. त्याची कृपा व सहानुभूती तुमच्यासाठी पुरेशी आहे. प्रत्येक कसोटीच्या समयी त्याच्याकडे जा — त्याच्यावर आपले ओझे टाका — जसजसे येत राहातील तसतसे तुमचे वधस्तंभ नैतिक दुर्बलता, भ्रष्टता त्याच्याकडे न्या — अगदी बेलाशक व त्वरेने येशूकडे घेऊन जा. ज्याच्याकडे विश्वासाने तुम्ही ते सोपवू शकता असा तो तुमचा बंधू व मित्र आहे, केव्हाही आणि कोणत्याही परिस्थितीत त्याच्याकडे जाऊ शकता असा तो आहे.

वधस्तंभामधून जगाकडे पाहणे

वधस्तंभाखेरीज इतर कोणत्याही मार्गाने येशू मानवाचे तारण सिध्दीस नेऊ शकत नव्हता — त्याचे मरण आणि तेही वधस्तंभावरचे मरणच अगत्याचे होते. वधस्तंभाभोवती काय गौरवी तेज व प्रकाशाचे किरण

आहेत! अत्यंत अद्भुत कृपेच्या घटनेचे हे साधन होय. किती गौरवी सत्यांचे हे चिन्ह आहे; कसल्या महान किमयेच्या शक्तीचा त्यात उगम आहे! जुन्या कराराचे सारे अर्थशास्त्र त्याच्या सभोवती गोळा होते. प्रत्येक चिन्हाचे ते स्पष्टीकरण करते — प्रत्येक छायेचा ते पुरावा देते — प्रत्येक रहस्य ते उकलते — प्रत्येक रूपकाची ते पूर्तता करते — देवाच्या पुत्राच्या वधस्तंभावरील मरणाशिवाय देवाच्या योजनेचे जे प्रत्येक भविष्य सर्वकाळाकरता अर्थ न उलगडता व स्पष्ट न होता राहिले असते, ते प्रत्येक भविष्य वधस्तंभ कायदेशीरपणे कायम करतो. केवळ गतकाळच नव्हे तर येणारे वैभव देखील प्रभू येशूच्या वधस्तंभाभोवती गोळा होते. त्या तारणाऱ्याच्या अखेरच्या राज्याची तो हमी देतो आणि त्याच्या दु:खसहनातून निघणाऱ्या प्रतिफळांविषयी सांगतो — त्याचा एक बाहू युगारंभापूर्वी झालेल्या दैवी मसलतीकडे इशारा करतो, तेव्हा दुसरा बाहु येणाऱ्या शाश्वत युगातील ख्रिस्ताचा विजय व गौरवी राज्याकडे इशारा करतो. असे हे सौम्य तरी भव्य दुर्बल — तरी पराक्रमी साधन आहे; त्याद्वारे पापी तारला जातो आणि देव सदासर्वकाळ गौरविला जातो.

पौलाच्या दृष्टिकोनातून मानवाविषयीच्या देवाच्या ईश्वरी व्यवस्थेची भव्य पूर्तता ख्रिस्ताच्या वधस्तंभात आहे. पतित मानवजातीसाठी ख्रिस्ताचा वधस्तंभाचे परिश्रम स्तुती व आत्मिक आशीर्वाद मिळविण्यास कारण ठरले आहेत. ख्रिस्ताचा वधस्तंभ ख्रिस्ताच्या व आपल्या शत्रुंवरील विजयाचे नेत्रदीपक दृश्य आहे. सुवार्तावादी पावित्र्यासाठी ख्रिस्ताचा वधस्तंभ अत्यंत उत्तेजनदायी आहे. ख्रिस्ताचा वधस्तंभ जगाला येशूच्या सर्वोच्च नियंत्रणाखाली आणण्यास साधन झाला. खरी शांती आनंद व आशेचे उगमस्थान आहे. ख्रिस्ताचा वधस्तंभ असा वृक्ष आहे की ज्याच्या सावलीत सर्व पाप मृत पावले व संपूर्ण कृपा जिवंत झाली.

आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा वधस्तंभ! जे या तारणाऱ्यावर प्रीती करतात त्यांच्या अंत:करणात हे शब्द पवित्र रोमांच उभे करतात! त्यांचा अर्थच किती महत्त्वपूर्ण आहे — त्यांचा प्रभाव लाख मोलाचा आहे! किती अद्भुत व प्रतिकार करता न येणारे त्याचे सामर्थ्य! पुष्कळ बंडखोर इच्छा ख्रिस्ताच्या वधस्तंभाने वश केल्या आहेत. संगमरवरी पाषाणाप्रमाणे असणारी कित्येक ऱ्हदये ख्रिस्ताच्या वधस्तंभाने भग्न

केली आहेत. अनेक बढाईखोर शत्रुंना ख्रिस्ताच्या वधस्तंभाने नमवले आहे. जेव्हा सर्व साधने अपयशी ठरली तेव्हा ख्रिस्ताचा वधस्तंभ मात करून विजयी झाला आहे. ख्रिस्ताच्या वधस्तंभाने सिंहासारखे मानवी ऱ्हदय कोकऱ्याच्या ऱ्हदयामध्ये परावर्तित केले आहे. आणि स्वत: उघड्यावाघड्या साधेपणाने व अद्वितीय श्रेष्ठतेने जेव्हा उंचावला गेला, तेव्हा ख्रिस्ताचा वधस्तंभ विजयी झाला आणि लक्षवधी लोकांना आपल्यावरील विश्वास, आपली प्रशंसा व प्रीती यांकडे वळवले.

ख्रिस्ताच्या या वधस्तंभाच्या ठायी केवढे *अद्भुत सामर्थ्य* आहे! ख्रिस्ती व्यक्तीच्या जगतातील संपूर्ण न्यायच तो पालटून टाकतो. वधस्तंभामधून जगाकडे पाहताना त्याच्या विचारप्रणालीत अमूलाग्र क्रांती घडून येते. त्याला ते जसे आहे तसे दिसते — सर्व काही पापी, रिक्त आणि व्यर्थ! तो हा अधर्म समजतो, त्या वधस्तंभावर त्याने जीवनाच्या गौरवी प्रभूला वधस्तंभी दिले, त्याचे जगावरील प्रेम बदलून गेले. त्याला आता प्रेमासाठी निराळे उद्दिष्ट सापडले आहे — ते म्हणजे जगाने ज्या तारणाऱ्याला बहिष्कृत करून ठार मारले तोच. आणि त्याचे जगावरील प्रेम तेथे त्याने तेथे नष्ट केले कारण ते केवळ त्याच्या सामर्थ्यानेच नाश पावू शकणार होते — हे आहे त्याचे वधस्तंभी खिळण्याचे सामर्थ्य!

खऱ्या विश्वासी व्यक्तीच्या दृष्टिकोनातून कोणत्याही इतर प्रत्येक वस्तूच्या आकर्षणाला हा वधस्तंभ ग्रहण लावतो. अशा कोणत्या शस्त्राद्वारे विश्वास जगाशी युध्द करतो आणि त्यावर मात करतो? येशूच्या वधस्तंभाखेरीज असे दुसरे कोणते शस्त्र असणार? सूर्याकडे टक लावून पाहू गेल्यास जशी आपल्या दैहिक नेत्रांवर त्याच्या प्रखर तेजाने क्षणभर अंधेरी येते व इतर कोणत्याही वस्तू आपण पाहू शकत नाही — तसेच विश्वासी व्यक्तीचे होते. जेव्हा ती वधस्तंभी खिळलेल्या गौरवी तारणाऱ्यावर आपले लक्ष केंद्रित करते, व वधस्तंभामध्ये प्रीती व सत्याचा मिलाफ झाल्याचे कृपेचे आश्चर्य अभ्यासू लागते — तेव्हा जग त्याच्या सर्व आकर्षणासह धूसर होत जाऊन त्यावर खग्रास ग्रहणाप्रमाणे संपूर्ण काळोख पसरतो. ख्रिस्त आणि त्याचा वधस्तंभ जग आणि त्याच्या प्रेमापेक्षा मर्यादेपलीकडे उत्तम नाहीत का? "आपला प्रभू येशू ख्रिस्त याच्या वधस्तंभाच्या अभिमानाशिवाय कशाचाही अभिमान बाळगणे माझ्या हातून न होवो; त्याच्याद्वारे जग मला व मी

जगाला वधस्तंभावर खिळलेला आहे."

तुमची दु:खे माझ्याजवळ आणा

"त्याला येथे माझ्याजवळ आणा." मत्तय १७:१७

तुमच्या ओदासीन्याच्या व नैराश्याच्या क्षणी येशू त्याच्या कृपाळू शब्दांनी तुम्हाला भेटतो, "येथे माझ्याकडे ते आणा." मग तुमचा आत्मा संजीवित होतो, तुमचे अंत:करण उल्लासित होऊन अशा शब्दांत गर्जून उठते की "हे पाहा प्रभू, मी आलो."

येशू म्हणतो, "तुमची दु:खे माझ्याजवळ आणा." कोणत्याही जिवाला कधी येशूसारखा एवढा सामर्थ्यशाली चुंबक आढळला नाही, की जो स्वत:कडे सर्व स्वरूपातील क्लेश, सर्व छटांची दु:खे आकर्षून घेतो. शापित जगाच्या केंद्रभागी उभा राहून तो प्रत्येक पापी, दु:खी शोकग्रस्त कन्येला त्याच्याकडे आधार, सहानुभूती व रोगनिवारण प्राप्त व्हावे म्हणून सर्व दुरुस्त होण्यासाठी आमंत्रण देत आहे. मंडळीचा प्रमुख याजक म्हणून त्याने एकट्यानेच दु:खसहन केले, रडला, आक्रोश केला. सामावून घेण्यास *प्रशस्त* , *पुरेशा प्रीतीने* व *सहानुभूतीने* भरलेले आपले ऊर प्रत्येक दु*:खिताला* कवटाळून घेण्यासाठी व प्रत्येक दु:खाला विसावण्यास उशी मिळण्यासाठी खुले करतो. त्याचे हे कळवळयाचे निमंत्रण स्वीकारा तरी! आणि अल्हाद देणाऱ्या, पोषण व पवित्रीकरण करणाऱ्या त्याच्या प्रेमळ अंत:करणाकडे तुमचे दु:ख घेऊन या.

काय हे दैवी रहस्य!

"त्याच्यावर तुमची सर्व चिंता टाका
कारण तो तुमची काळजी घेतो." १ पेत्र ५:७

हे किती जिव्हाळयाचे व आरामदायी शब्द आहेत! ऱ्हदयाला निवांत करून ते उमलून त्याला बहरायला लावणारे असे कोणते फूल जगाच्या कोणत्या रानात उगवेल? हे शब्द किती काळज्या हलके करतात! केवढ्या चिंता ते दूर करतात! किती ओझी हलकी करतात! किती दु:खी व दडपलेल्या अंत:करणांसाठी आनंद, समाधान व आशेचे झरे त्यांनी शिक्के फोडून खुले केले! पण हे प्रिय वाचका, सतत तू या दैवी

रहस्याचे स्मरण करणे गरजेचे आहे ना? — संकटात मिळणारा विसावा — बेचैन असताना प्राप्त होणारा आराम — खाऊन टाकणाऱ्या चिंतांमधून जात असताना मिळणारा दिलासा — परिस्थिती बदलल्याने खिन्नतेत मिळणारी हिम्मत व आशा तू स्मरायला नको का?

तुला असंख्य चिंता काळज्यांच्या विचारांनी दडपलेले व पेचात पाडलेले असताना — त्या काळज्यांनीच तुझे शोषण होऊन त्या *संरक्षकाकडेच* तुझे दुर्लक्ष होण्याचा धोका नाही का? ऱ्हदयातील ओसंडून वाहणाऱ्या चिंतांपुढे ऱ्हदयाचा विसावा विसरून जावा का? त्याच्यावर आपल्या सर्व चिंता टाक कारण तो तुझी काळजी घेतो.

माझ्यासारख्या कवडीमोल दरिद्री पाप्यासाठी

"त्याने स्वत: तुमची आमची पापे स्वदेहाने वाहून खांबावर नेली यासाठी की आपण पापाचरणासंबंधाने मृत होऊन धार्मिक आचरणासाठी जिवंत राहावे; त्याला बसलेल्या मारांच्या वळांनी तुम्ही निरोगी झाला आहा" १ पेत्र २:२४.

आशीर्वादाची घोषणा! पापांची क्षमा झाली आहे, पापाचा जराही द्वेष वाटत नाही की पाप द्वेष्य वाटत नाही, असे नाही तर ती पूर्णपणे पुसून टाकली आहेत. देवाचा तुमच्या अंत:करणाला स्पर्श होऊ द्या. हे ख्रिस्ती वाचका, त्याच्या क्षमाशील प्रीतीच्या जाणीवेने — क्षमा केल्याच्या खात्रीने तुम्ही त्याच्याकडे जाल तर पापाचा द्वेष कराल, ते मृत पावू द्याल, त्याचा त्याग कराल, कधी नव्हे अशा निर्धाराने व प्रभावीपणे कराल. त्यासाठी देवाचा पुत्र मानवाचा पुत्र झाला यासाठी की जी स्वभावत:च क्रोधाची मुले आहेत, त्यांनी देवाची मुले व्हावे. त्या सार्वकालिक देवाला, त्या महान व सर्वश्रेष्ठाला लवून खाली यावे लागले व तेही या पाप्यासाठी मानवधारी व्हावे लागले — माझ्यासारख्या दरिद्री, कवडीमोल पाप्यासाठी!

मला सार्वकालिक क्लेशांपासून वाचवण्यासाठी, येशूला दु:खसहन करणे भाग पडले, यातना सोसून मरणे भाग पडले — माझ्या बदली, माझ्या पापांसाठी मरावे लागले, तेही शापित मरण मरावे लागले! अरे देवा! किती भयानक असले पाहिजे हे पाप — कसे असेल ते माझे

पाप! मी यावर किती अल्प प्रमाणात विचार केला, किती तोकडा शोक मी त्यासाठी केला, अजूनही मी त्या पापाचा करावा त्यापेक्षा किती कमी द्वेष करतो, हे प्रभो मी किती अधम, वर्णन करता येणार नाही इतका अधम! दुष्ट पापी ! माझ्या दयाघन पित्या, तू ते क्षमा करतोस? त्यामुळे तर मला ते अधिकच द्वेष्य वाटावे!

देवाने आपला क्रोध त्याच्या पुत्रावर सैल सोडला

ख्रिस्ताच्या वधस्तंभात दैवी प्रीती उत्तम प्रकारे प्रदर्शित झालेली दिसते. त्या सार्वकालिक, भयानक नरकाचे दु:खसहन केले तिथला किडा मरत नाही की तिथला अग्नी विझत नाही, तेथील क्लेशांचा धूर सदासर्वकाळ वर जात राहातो. देवाच्या पावित्र्याने व न्यायाने पापाला दिलेल्या शिक्षेचे एवढे प्रभावी व गंभीर दृश्य देवाच्या पुत्राने सहन केलेल्या मरणात सादर झालेले दिसते.

प्रसिद्ध प्युरिटन लेखक मनाला भिडणाऱ्या शब्दांत असे मांडतो, "या दुष्ट जगावर असतील तेवढ्या न्यायाच्या कुप्या फोडल्या —— पाप्याचा विवेकभाव कितीही तप्त भट्टीत घातला —— बंडखोर सैतानाला शेवटचा व अखेरचा दंड ठोठावला —— दोषी प्राणिमात्रांनी त्यात कितीही कण्हून आक्रोश केला, तरी ते देवाला पापाविषयीचा असलेला द्वेष व त्याच्या पुत्रावर सैल सोडलेला क्रोध दाखवू शकणार नाहीत.

मरणयातना सोसताना कण्हत असलेल्या व घायाळ झालेल्या तारणाऱ्याच्या तेजस्वी मुखावर कधी नव्हे इतके सुंदर दैवी पावित्र्याचे दर्शन घडले. हे प्रायश्चित्ताच्या स्तोत्रात त्याने स्वत:च कबूल केले आहे. जेव्हा देवाने आपला हसरा चेहरा त्याच्यापासून मागे वळवला, आणि तीक्ष्ण सुरा त्याच्या ऱ्हदयात खुपसला तेव्हा ती आर्त आरोळी मोठ्याने त्याच्या मुखातून बाहेर पडली, "माझ्या देवा, माझ्या देवा तू माझा त्याग का केलास? माझ्या दु:खाचा आक्रोश ऐकून माझा बचाव करावयास तू जवळ नाहीस. पण *तू पवित्र आहेस.*"

असे हे देवाच्या पावित्र्याचे दृश्य यापूर्वी स्वर्गीय देवदुतांनी कधीही पाहिले नव्हते —— जेव्हा पतित देवदूतांना गौरवी उंचीवरून खाली अधोलोकात लोटून देण्यात आले व त्यांना साखळदंडांनी बांधून सार्वकालिक नाशासाठी अंधकारात राखून ठेवले, तेव्हाही त्यांनी हे

पाहिले नव्हते. येशू तर निरपराध असून अपराध्यांसाठी मरण पावत होता — *जो पवित्र तो पाप्यांसाठी मरण पावत होता.*

न्यायाचे कार्य करताना दैवी न्याय, जेव्हा झाडून सारा वधस्तंभावर ओतला गेला, तेव्हा देवाचा पुत्र त्याच्या लोकांच्या पापाच्या व शापाच्या खाली लाकडी सुळावर त्यात सापडला. त्याच्यावर तो सारा न्याय पडला — त्याच्या जिवावर त्याचा क्रोध ओतला गेला — त्याच्या ऱ्हदयात त्याची तळपती तलवार खुपसली गेली — मानवाच्या अपराधांबद्दलची पूर्ण शिक्षा न्यायाने तेथे वसूल केली — *मोठ्या ऋणाची शेवटची दमडीही फेडून घेतली!*

हे वाचका, मग जा ना त्या वधस्तंभाजवळ, आणि त्याचे पावित्र्य जाणून घे. ख्रिस्ताच्या श्रेष्ठत्वावर गंभीर विचार कर — पित्याच्या ऱ्हदयाला तो किती प्रिय आहे — स्वभावत:च निष्पाप असलेला! आणि मग पाहा — त्याच्या जिवाचे दु:ख — त्याचा शारीरिक छळ — त्याच्या मृत्युची शोककथा — मानहानी — अप्रतिष्ठा — अपमान — आपल्या देहधारी देवामध्ये अतिखोल खुपसत झालेला हा व्यवहार पाहा. या अतुलनीय दृष्यासमोर तू आहेस तसा उभा असताना मला विचारू दे "तुला देवाच्या पावित्र्याची ही अपुरी कल्पना जतन करावीशी वाटते की तुझ्या स्वत:च्या पापिष्टपणाचे हलके चित्र?

अहाहा! किती उत्तेजनदायी सत्य!

"मी परमेश्वर ऱ्हदय चाळून पाहतो, अंतर्याम पारखतो."
— *यिर्मया १७:१०*

दैवी स्वभावाचे हे गंभीर दृश्य आहे. विश्वासणाऱ्याच्या मनाला त्याच्या ओंजळीत विसावा सापडतो. अत्यंत कसोटीतून चाललेल्या देवाच्या मुलाला यापेक्षा दु:खपरिहार करणारे सत्य दुसरे कोणते असेल? — *प्रभू अंत:करण जाणतो.* जग आपल्याला दोषी ठरवेल, पवित्र जनही आपली चूक पारखतील — पण देव आपले अंत:करण जाणतो. ज्यांनी खोलवर आपल्या अंत:करणाची झडती घेऊन लपलेले पाप शोधून काढले असेल, व ज्यांना ते उघड झाल्यानंतर खेद वाटून जोरदार धक्का बसला असेल त्यांना देवाचा हा गुण लाख मोलाचा वाटला असेल की "मी परमेश्वर ऱ्हदय चाळून पाहतो."

आपल्या अंत:करणात एखादी फट पडली आहे का की त्याच्या भेदक नजरेपासून काही तेथे काही लपू शकेल? एखादी भ्रष्टता त्याच्या दृष्टीपासून आपण लपवू शकू? एखादे घोर पातक आपण त्याला समजू देणार नाही? मुळीच नाही. ही अपमानकारक व अपमानास्पद बाब आहे. आपण सर्व दारे सताड उघडी ठेवावीत, खिडक्या उघडाव्यात आणि त्याला झाडाझडती घेऊन तपासणी करायला आमंत्रित करावे. काहीही झाकून ठेवू नये, प्रिय वाटणारे काही राखून ठेवू नये, आणि अंत:करण तपासून झडती घेणाऱ्या त्या महान व्यक्तीला म्हणावे, "हे देवा, माझी झडती घेऊन माझे ऱ्हदय जाण; मला कसोटीस लावून माझे मनोभाव तपास. माझ्याठायी दुष्टपणाकडे काही प्रवृत्ती असेल तर पाहा आणि मला सनातन मार्गाने ने."

या प्रकारे देवाने आपल्या अंत:करणातील अधर्म जाणून घेतला की तो अत्यंत कृपेने ते पातक इतरांच्या नजरेपासून अच्छादतो. त्याच्या परोपकारी स्वभावातून तो म्हणतो, "माझ्या मुलाचा अधर्म मला दिसतो." मग आपल्या हातांनी तो आमचा अधर्म झाकतो आणि उद्गारतो, "कोणाचे नेत्र नव्हे, माझेच नेत्र ते पाहतात." किती ऱ्हदयस्पर्शी मृदुता, आपल्या देवाचे प्रेमळ वात्सल्य! आपल्या स्वभावातील सर्व अधमता जाणूनही ते पाप तो मानवी नेत्रांपासून झाकतो — यासाठी की इतरांनी आपण स्वत:चा नेहमी करतो तसा आपला तिरस्कार करू नये. देवाशिवाय ती कोण जाणू शकतो? देवाशिवाय ती कोण अच्छादू शकतो?

आणि हे स्मरण ठेवण्यातही केवढी धन्यता वाटावी की देवाला सर्व अधर्म माहीत असूनही तो किती भल्या अंत:करणाने आपल्या लोकांमधील चांगुलपणाशी दाट ओळख ठेवतो. त्याला माहीत आहे की त्याच्या आत्म्यानेच ते चांगुलपण आपल्या ठायी रोपले आहे हे — सारे त्याच्या कृपेने घडवून आणले आहे. किती उत्तेजनदायी सत्य! त्या प्रीतीची अंधुक, मिणमिणती ठिणगी — जीवनाच्या नाडीचे ते ठोके, मंद आणि कापत — मागेपुढे पाहत विश्वासाने केलेला तो क्षीण स्पर्श — ते उसासे व कण्हणे — स्वत:विषयी न्यूनतेचे विचार, हेच माणसाला आसरा शोधायला भाग पाडतात — स्वत:विषयीचा अनादर त्याला धुळीत तोंड खुपसायला लावतो — यातील एकही पवित्र भावना त्या देवाच्या नजरेतून सुटत नाही, त्याने ती पाहिली नाही

असे होत नाही. *अमर्याद कळवळ्याने त्याचे नेत्र टक लावून असतात व त्याची स्वत: ची प्रतिमा त्याला त्या रूपांतरित जिवात दिसून आनंद होतो.*

तुमची सध्याची आपत्ती

"परंतु आपल्याला ठाऊक आहे की, देवावर प्रीती करणाऱ्यांस म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलावलेल्यांस देवाच्या करणीने सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात." रोम ८:२८

स्पष्टपणे उघड केलेले जोरदार सत्य हे आहे की देवाच्या लोकांच्या जीवनातील देवाच्या कारभारामुळे जे काही घडते ते सर्व एकत्रितपणे सिद्धीस जाते, ते परिणामकारक असते, त्यांचे ते अत्युच्च कल्याण करून त्यांना महान आनंदाने भरते. देवाच्या मुलाच्या जीवनाच्या इतिहासात एकाकी, अत्यंत उदास, यातनादायी परिस्थिती त्याचे कायमस्वरूपी कल्याण करण्यासाठी एकत्रितपणे कार्यरत असते.

देवाची यातनादायी व अवर्णनीय योजना आता अंधारलेली आणि तुमची वाट अधिकच खोल खोल नेणारी वाटत असेल पण देवाच्या शासनव्यवस्थेत पुष्कळ रहस्ये आहेत, त्यावर तो खात्रीशीर, समाधानकारक व आनंददायी परिणाम दाखवणारे काम करीत आहे. जेव्हा सर्व बाजूंनी चांगुलपणाने घेरून खाली उतरणाऱ्या त्या ढगांतून भरघोस तरतूद केली जाईल, व स्वर्गातून झालेले परोपकाराचे काम सिद्धीस जाईल, तेव्हा संकट आपले पंख विस्तारून उडून जाईल — आणि दु:ख आपला गडद वेष गुंडाळून अदृश्य होईल.

सर्व गोष्टी अमर्याद महान, सर्वस्वी ज्ञानी, नीतिमान व फायदेशीर असणाऱ्या प्रभू देवाच्या अधिपत्याखाली असतात तेव्हा सर्व काही कल्याणार्थ असे कार्य होते. ते भले काहीही असो — त्याचे स्वरूप कसेही असो — ते कोणत्याही वेषात येवो — शेवट मात्र समाधान देण्याची उत्कट इच्छा घेऊन आलेला असेल — ते आपण सांगू शकत नाही. *आपल्या अंधुक नजरेला* ते अधम दिसेल, पण दूरवरचे पाहणाऱ्या देवाच्या नेत्रांना ते सकारात्मक, कल्याणकारी दिसेल. हे अत्यंत दैवी सत्या! हे शब्दही किती त्रोटक!

ज्यांचे नेत्र या पानावरून फिरतील, त्यांच्या नेत्रातील अश्रुंनी ते चिंब होईल. ज्यांचे उसासे त्यावरून जातील, ज्यांच्या प्रार्थना त्याच्या ओंजळीत पडतील, कदाचित खोल पाण्यात उसासे टाकले जात असतील, कदाचित कटु प्याला ते प्राशन करत असतील, आणि हे उद्गार काढण्याच्या ते तयारीत असतील की, "या सर्व गोष्टी माझ्या विरोधात घडत आहेत!" — प्रियांनो असे नाही, हे सर्व तुमच्यासाठी आहे! भिऊ नका! ख्रिस्त त्या पुराला आवर घालत आहे, त्याच्या हेलकावणाऱ्या उरावर तो गंभीरपणे विराजमान होतो. ख्रिस्त पाण्याला आपल्या नियंत्रणात ठेवतो, त्याच्या गर्जणाऱ्या लाटा त्याच्या वाणीचा हुकूम ऐकतात. ख्रिस्ताचा मेघांचा रथ प्रीतीने अच्छादलेला आहे! मग भिऊ नकोस! वादळात हेलकावणाऱ्या तुझ्या जहाजाच्या सुकाणूवर तुझ्या नियंत्रक पित्याची पकड आहे — आणि मेघ व वादळातूनही ते सुरक्षितपणे अविरत विसाव्याच्या बंदराकडे चालविले जाईल!

जर सध्या तुझ्यावर विपरीत परिणाम करणाऱ्या काही आराध्य मूर्त्यांना सिंहासनावरून झुगारून दिले तर ते खरोखर चांगले होणार नाही का? ख्रिस्त तुला प्रिय होणार नाही का? देवाच्या प्रतिमेला तुझे मन दाट पुष्टी देणार नाही का? तुझ्या अंत:करणाचे शुद्धीकरण होणार नाही का? तू स्वर्गासाठी अधिकाधिक योग्य होणार नाहीस का? जर देवाचे तुझ्याठायी संजीवनाचे काम होण्यात त्याचे रूपांतर झाले तर ते चांगले होणार नाही का — तुला अधिक प्रार्थना करण्यास चालना मिळणार नाही का? जे सर्व त्याच तारणाऱ्यावर प्रीती करतात अशांसाठी तुझे मन विशाल होणार नाही का? पाप्यांच्या तारणासाठी चालणाऱ्या वाढत्या कार्यासाठी, सत्याचा प्रसार करण्यासाठी, आणि देवाच्या गौरवासाठी तुलाही कार्य करण्याची चालना मिळणार नाही का?

होय! उत्तम, खरोखर तुझ्या इतिहासात उत्तम, कायमस्वरूपी उत्तम दैवी योजनेनेच परिणामकारी होते. कटू पश्चात्तापाचा अंत ख्रिस्ताच्या प्रीतीच्या गोड अनुभवानेच होतो. चिघळलेले घाय त्याच्या आरोग्यदायी मलमपट्टीनेच बरे होतात. बोजड झालेल्या ओझ्यापासून अखेर तुला नि:शब्द शांतीच मिळते. वादळामुळे उलट तुझी पावले वेगाने लपण्याच्या गुप्त स्थळी तुला नेतील. उत्तरेचा थंड वारा आणि दक्षिणेचा अल्हादकारक वारा तुझ्या बागेवरून एकत्र वाहील आणि मसाल्यांचा सुगंध दरवळेल.

थोड्याच वेळात — हो, लवकरच — तू हे जग सोडून स्वर्गात निघून जाशील, आणि तेथील लख्ख व प्रसन्न करणाऱ्या प्रकाशात सत्य वाचशील, अश्रुपूर्ण नेत्रांनी वाचशील, "आपल्याला ठाऊक आहे की, देवावर प्रीती करणाऱ्यांस म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलावलेल्यांस देवाच्या करणीने सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात."

जीवनातील क्षुल्लक गोष्टी

"फार तर काय, तुमच्या डोक्याचे सर्व केसही
आहेत, भिऊ नका." — लूक १२:७

हे माझ्या वाचका, तुला देवाविषयी फार थोडी महिती आहे, कारण तू देवापासून फार दूर राहतोस. तुझा त्याच्याशी अगदी थोडाच संवाद होतो — पापांची थोडीफारच कबुली दिली जाते — स्वत:च्या विवेकभावाचे अल्प प्रमाणात परीक्षण केले जाते — तुझ्या स्वत:च्या अंत:करणाची किती कमी झाडाझडती घेतली जाते — जीवनातील क्षुल्लक गोष्टींत किती थोडा व्यवहार होतो. तू मोठमोठ्या बाबतीतच फक्त देवाशी व्यवहार करतोस. मोठमोठ्या परीक्षा, मोठे पेच, मोठ्या गरजा तू देवाकडे नेतोस. पण रोजच्या क्षुल्लक घटना किंवा ज्यांना आपण जीवनातील बारीक सारीक गोष्टी म्हणतो, त्याबाबत तुझा देवाशी अजिबात व्यवहार होत नाही — त्याचा परिणाम असा होतो की तुम्हाला प्रीतीविषयी फार कमी माहिती होते, सुज्ञता कमी असते, गौरवाविषयी, कराराच्या तेजस्वी देवाविषयी, आणि समेट झालेल्या पित्याविषयी अल्प ज्ञान असते.

मी तुम्हाला सांगतो, जो मनुष्य *क्षुल्लक बाबतीत* देवासह राहतो — जो जीवनाच्या क्षुल्लक गोष्टींत देवासह चालतो — अशाच मनुष्याला देवाची उत्तम ओळख असते — त्याचे स्वभावविशेष, त्याची विश्वसनीयता, त्याची प्रीती तो जाणतो. माझ्या रोजच्या परीक्षांमध्ये मी देवाला भेटणे, मला ज्या परीक्षांसाठी पाचारण झाले आहे, त्या त्याच्याकडे नेणे, माझ्या मंडळीतील परीक्षा, माझ्या कुटुंबातील परीक्षा, खुद्द माझ्या अंत:करणाच्या परीक्षा, ज्या माझ्यावर मृत्युनिद्रा आणतील अशा गोष्टी, ऱ्हदय फुटून मला आर्त उसासे

टाकायला लावणाऱ्या गोष्टी — हे लक्षात ठेवा की देवाकडे या गोष्टी नेणे अगदी क्षुल्लक मुळीच नाही — उलट अगदी लहानसा कलंक जरी आपल्या विवेकभावाला लागला, मनावर पापाचे किंचितही दडपण आले, देवापासून दुरावल्याची पुसटशी जरी जाणीव झाली — तरी ती त्याच्याकडे न्यायची, वधस्तंभाच्या पायथ्याशी त्याविषयी कबुली द्यायची, घायाळ अर्पणाला विश्वासाच्या हातांनी स्पर्श करायचा — या प्रकारांनी मनुष्य देवाच्या घनिष्ठ ओळखीत येतो.

प्रेमळ कृपाळू व उदार पिता

प्रियांनो, लक्षात ठेवा की आपला सर्व गतकाळ व आपली आगामी भरभराट, जर त्याने नेमली आहे तर — ती देवाच्याच हाती आहे. त्याचे ज्ञान आपल्या योजना सुचवते, त्याचे सामर्थ्य त्यांना मार्ग दाखवते, आणि त्याचे चांगुलपण त्या यशस्वी करते. आपल्या मार्गावर फुलणारे प्रत्येक फूल — त्याला हर्षित करणारे प्रत्येक स्मित — त्याला ओलावा देणारी प्रत्येक दया, आपल्या स्वर्गीय पित्यापासून येते. देवाच्या या सर्व दयेत आपण किती त्याची कृपा ओळखावी बरे! आपला गोडवा अधिक गोड होईल — आपले आशीर्वाद अधिक धन्यवादित होतील — आपली प्रियता अधिक प्रिय होईल — पाहा, ही सर्व त्या पित्याने पसरलेल्या दानशूर, प्रेमळ, कृपाळू व उदार हस्तांमधून दिली जात आहेत. अहो, आपणही आपली अंत:करणे प्रीतीने, कृतज्ञतेने व स्तुतीने उंचावून त्याच्या पावित्र्याचे उतराई होऊ या!

निरनिराळे सर्व व्यवहार

"त्याने सर्व काही चांगले केले आहे." — मार्क ७:३७

होय, आरंभापासून शेवटापर्यंत, पाळण्यापासून कबरेपर्यंत, पापाच्या अगदी पहिल्या खात्रीपासून ते पापाच्या क्षमेविषयीच्या अखेरच्या रोमांचापर्यंत, आपली हीच साक्ष असेल की आमच्या प्रभूने आम्हाला अरण्यातून चालवले — त्याने सर्व काही चांगले केले आहे. पुरवठा करण्यात व कृपेत, त्याच्या वचनातील प्रत्येक सत्यात, त्याच्या प्रीतीचा प्रत्येक धडा देण्यात, त्याच्या काठीच्या प्रत्येक तडाख्यात, प्रकाशलेल्या प्रत्येक किरणात, प्रत्येक मेघाच्या छटेत, गोडवा देणारा

प्रत्येक घटक, दुखावणारा प्रत्येक घटक, जेवढे म्हणून रहस्यमय, यातना देणारे, आणि अपमानास्पद, जे सर्व त्याने दिले, जे सर्व त्याने काढून घेतले, त्या सर्वांविषयी हीच साक्ष आपण देणे आहे. आणि हेच आपण सर्व युगात व सदासर्वकाळ मान्य करायचे आहे — त्याने सर्व काही चांगले केले आहे.

अशक्यप्राय म्हणावे अशा प्रकारे कृपेद्वारे त्याने आपले परिवर्तन केले का? त्याने आपल्या सर्व जगिक आशा मुळापासून उपटल्या का? त्याने आपल्या योजना उधळून लावल्या, आपले आराखडे निष्फळ ठरवले, आपले अपेक्षाभंग केले? त्याने फार कठीण शाळांमध्ये आपल्याला शिकवले, तेव्हा गंभीर शिक्षांचा वापर केला, आणि आपला स्वभाव नम्र करणारे धडे दिले का? आजाराने त्याने आपले शरीर दुर्बल करून जर्जर केले का? हानी करून आपल्याला दरिद्री केले का? दु:खाने आपले ऱ्हदय पिळवटून टाकले का? आणि आपल्याला असे उद्गार काढण्याचा मोह होतो का की "हे सर्व माझ्या विरोधात घडवले"?

असे नाही बरे! विश्वास वरचढच होईल आणि गोड आवाजात गाईल, "सर्व गोष्टी प्रतिकूल घडल्या, तरी माझ्या येशूने सर्व चांगलेच केले आहे." प्रियांनो असे घडले असेल, तरी येशू काहीच चुकीचे करू शकत नाही. तो कशा प्रकारे पुरवठा करतो व कृपा पुरवतो हे सूक्ष्मदर्शक विश्वासाच्या नजरेने पाहून अभ्यास करा. प्रत्येक प्रकारे प्रकाशझोत टाकून पाहा, त्यांची तपासणी जशी फुलाच्या पाकळीची, कीटकाच्या पंखाची करावी तशी बारकाईने तपशीलवार करा. आणि पाहा किती नवलाई, किती सौंदर्य , जुळवून घेण्याचा आश्चर्यकारक गुण तुमच्या गौरवी प्रभूच्या या विविध गोष्टी न्याहाळताना तुम्हाला आढळतील. त्याने सर्व काही चांगले केले आहे.

या येशूला ओळखणे

येशूचे नाव आपल्या ऱ्हदयाला प्रिय वाटण्यासाठी गरजेचे सर्व येशूच्या ठायी आहे. तो आपला *संदेष्टा* असून आपल्याला देवाची इच्छा काय आहे ते शिकवतो. तो आपला *याजक* असून आपला प्रायश्चित्ताचा बळी म्हणून त्याने स्वत:चेच अर्पण केले. तो आपला *राजा* असून त्याचे सिंहासन आपल्या अंत:करणात स्थापतो. त्याची लाडकी व

आज्ञांकित प्रजा म्हणून तो आपल्याला त्याच्या ताब्यात ठेवतो. तो आपला *मित्र* असल्याने सतत आपल्यावर प्रीती करतो. तो आपला *भाऊ* असल्याने आपल्या हाडातले हाड व मांसातले मांस म्हणून आपल्या दु:खद परिस्थितीसाठी जन्मला. तो आपला *प्रमुख याजक* असल्याने आपल्या अधर्माच्या भावनांना स्पर्श केला, आपल्यासारखा सर्व प्रकारे पारखला गेला — आपल्या दु:खात, शोकात व संकटात असताना त्याने आपल्या मृदू, प्रेमळ सहानुभूतीच्या बहुपदरी झग्याने आपल्याला घेरले.

येशूला ओळखणे म्हणजे काय — हे तर सर्वोच्च उत्कृष्ट ज्ञान! त्याला प्राप्त करण्यासाठी पौलाप्रमाणे आपणही सर्व काही हानी असे समजावे. त्याला *तारणारा* म्हणून ओळखणे, आपला *मित्र* म्हणून ओळखणे, आपला बंधू म्हणून ओळखणे, आपला *कैवारी* म्हणून ओळखणे, आपला *वाटा* म्हणून ओळखणे हे अविरत जीवन व गौरव होय.

जीवाला समाधान देणारे दृश्य

येशूचे दर्शन म्हणजे जीवाला समाधान देणारे दृश्य! *पश्चात्तप्त* जीव तेथे सांत्वन पावतो, कारण येशूच्या ठायी त्याला मोफत पापक्षमा प्राप्त होते. *दोषी* जीव तेथे तृप्त होतो, कारण येशूकडे तो नीतिमान ठरवला जातो. *विश्वास ठेवणारा जीव* तेथे तृप्त होतो कारण येशूठायी त्याला कृपेचा झरा सापडतो. *पारखला गेलेला, परीक्षेतून गेलेला दु:खित जीव* तेथे समाधान पावतो कारण येशूमध्ये तो पूर्ण सांत्वन, सहानुभूती व प्रीतीचा अनुभव घेतो. अहाहा! किती संपूर्ण समाधानाचा वाटा येशू आहे! तो प्रत्येक पवित्र इच्छा तृप्त करतो — कारण तो ती जाणतो. तो प्रत्येक निकडीची गरज पूर्ण करतो — कारण तो तिचा पुरवठा करतो. तो दु:खाच्या प्रत्येक दुखऱ्या जखमेला आराम देतो — कारण तोच ती बरी करतो. तो खोलवरची आतुरता, उत्कट इच्छा, झालेल्या जीवाच्या उदात्त आशा तोच शमवतो — कारण या सर्व गोष्टी त्याच्या ठायी केंद्रित असून त्याच्यामध्ये संपतात.

सर्वांगसुंदर असलेला

कोणते गडद स्वर्गीय रंग वापरून कोणत्या लेखणीने आपण येशूचे चित्र रेखाटू शकू? आपल्या प्रभू येशूची परिपूर्णता म्हणजे त्याच्या पावित्र्याची परिपूर्णता होती. त्यात त्याचे देवत्व, त्यातील महत्त्वपूर्ण

पावित्र्य, त्याचे निष्पाप मानवत्व होते, ज्यात त्याचे पावित्र्य व्यक्तिमत्त्वाच्या भूमिकेत होते. तो जे सर्व काही आहे, तो जे बोलला, त्याने जे केले, ते सर्व शुद्धतेच्या मूलभूत झऱ्यातून उगम पावलेल्या पावित्र्याचा लखलखाट होता. त्याचा अविनाशी नेत्रदीपक प्रकाश त्याने तुडवलेले एक एक पाऊल उजळून टाकत होता. त्याचा स्वभावही किती नम्र! त्याच्या प्रत्येक उच्छवासात पावित्र्याचे विचार होते. किती शुद्ध बोल तो बोलला, किती सौम्य आत्म्याचा आदर्श त्याने ठेवला, मानवावरील त्याची प्रीती व कळवळा ही किती झोकून देणारी व सहानुभूतीपर होती. *तो सर्वांगसुंदर, दहा हजारात देखणा आहे.*

तुमच्या अभ्यासाचे प्रमुख उद्दिष्ट

माझ्या वाचका, आपल्याला दैवी सत्यांविषयी जी पुष्कळ माहिती आहे, तशाच प्रमाणात आपल्या अंतर्यामाला त्यांचा वैयक्तिक अनुभव हवा. विज्ञानात जसे केवळ खोटे दावे व पुस्तकी ज्ञान काही उपयोगी व समाधान देणारे नसते, तसे धर्माच्या बाबतीत फक्त *सिद्धांत मांडणे* व *तर्कशास्त्र* काही उपयोगाचे व समाधानकारक नसते. प्रत्यक्ष व्यावहारिक उद्दिष्टासाठी त्याचा काही उपयोग नाही. आपल्या आध्यात्मिक ज्ञानाचा स्तर व आपले चारित्र्य येशू ख्रिस्ताच्या ज्ञानात उगम पावून त्याचे स्थित्यंतर होत राहाते. त्याच्या वास्तवाची कसोटी — त्याच्या खोलीचे मोजमाप — आणि त्याच्या वाढीचा उगम ख्रिस्त होय.

जर तुम्ही प्रभू येशू ख्रिस्ताच्या ओळखीत, पवित्रीकरणात व प्रत्यक्ष वाढत आहात तर पौल ज्या ज्ञानाचे वर्णन करतो, "ख्रिस्त येशू माझा प्रभू ह्याच्याविषयीच्या ज्ञानाच्या श्रेष्ठत्वामुळे मी सर्व काही हानी असे समजतो," त्यात तुमची वाढ होत आहे. प्रिय वाचका, तुझ्या अभ्यासाचे प्रमुख उद्दिष्ट प्रभू येशूला ओळखणे हेच असावे. तुझ्या पापाचे क्षेत्र, रिक्तपण, दुर्बलता आणि मूर्खता याविषयी त्याच्याकडून शिकणे हे असेल. पण कितीही अपमानित करणारी ती शाळा असली, तेथे तुझी कितीही धीमेपणे प्रगती होत असली, व मर्यादित स्वरूपातच काही हाती लागत असेल, व सर्व मानवी विज्ञानात पारंगत ज्ञानाच्या मोठ्या पेटाऱ्यापेक्षा, तसेच कितीही अवर्णनीय संपत्ती तुझ्या चरणाशी आणून ओतली तरी त्यापेक्षा तुला वास्तव व मोलवान मालमत्तेत

आणणाऱ्या थोर व विजयी प्रभू येशूला तू व्यक्तिगत रीतीने ओळखत नव्याने प्रत्येक पाऊल टाक.

जेव्हा आपत्ती येतील, मरण जवळ येईल, जेव्हा अनंतकालावरील अच्छादन दूर केले जाईल, तेव्हा वाहवा! तेव्हा तो विश्वासाचा स्पर्श किती अवर्णनीय मोलाचा, किती अगम्य किंमतीचा असेल, वधस्तंभी जाऊन पुनरुत्थित झालेल्या तारणाऱ्याची ती विश्वासू नजरभेट असेल. तेव्हा आपण प्राप्त केलेले इतर सारे काही नाहीसे होईल. मग सतत राहणारे, दिलासा देणारे, सांत्वन देणारे ज्ञान मात्र उरेल. ही शुभवर्तमानाच्या वास्तवाची हृदयाला जाणवलेली अत्युच्च ओळख होय — की येशू ख्रिस्त पाप्यांना तारण्यासाठी या जगात आला. अहाहा! तुमचे विचार कोणत्याही अभ्यासात व्यस्त असतील, पण तुम्ही जर सार्वकालिक भविष्य मोलवान समजत असाल, तर प्रभू येशू ख्रिस्ताचा अभ्यास करायला विसरू नका.

सहज गाठण्याजोगे मोलवान स्थळ

"येशूच्या वधस्तंभापाशी त्याची आई उभी होती." — योहान १९:२५

येशूच्या वधस्तंभाजवळ मरीयेसोबत तुमची जागा घ्या. तेथे प्रीती आणि दु:खसहनाचा मिलाफ झाल्याचे तुम्हाला पाहायला मिळेल — शोक आणि सहानुभूती. विश्वासाने वधस्तंभाजवळ, दु:खसहन करणाऱ्या तारणाऱ्याजवळ, प्रेमळ पुत्राजवळ, तुमचे सध्याचे क्लेश वाहणाऱ्या, सहानुभूती व्यक्त करणाऱ्या बंधुजवळ तुम्ही उभे आहात. आताप्रमाणे तेव्हा त्या क्षणीही यातना भोगत असता येशूने खोल व हळूवार प्रीतीने आपल्या शोकग्रस्त मातेवर सहानुभूतीने भरलेला अवर्णनीय पुत्रप्रेमाचा कटाक्ष टाकला.

त्याचप्रकारे तो तुमच्या परिस्थितीतही प्रवेश करतो, तुमचे दु:ख समजून घेतो, केवळ तोच तुमच्या आत्म्याला दिलासा व शक्ती देतो. आता जो दु:खाचा प्याला तुमच्या हातात कंप पावत आहे, त्याचा तो विभागी आहे. त्याच्या इच्छेच्या अधीन होऊन तो प्याला प्या, कारण तुमच्या आधी त्याने तो तीव्र दु:खाचा प्याला प्राशन केला आहे, आणि त्याच्या सहानुभूतीचा सुगंध त्या पेल्याच्या काठावर दरवळत ठेवला

आहे. आता तुमचे दु:ख ख्रिस्तासाठी नवीन नाही. येशूच्या वधस्तंभाच्या जवळ उभे राहा. स्वर्गाच्या या बाजूची ही मौल्यवान व सहजसुलभ जागा आहे — अत्यंत गंभीर, नवलाईची अशी या बाजूची सार्वकालिक जागा आहे.

येशूचा वधस्तंभ दैवी प्रीती, सहानुभूती व सामर्थ्याचे केंद्रस्थान आहे. क्लेशातून, छळातून, परीक्षेतून जाताना त्या वधस्तंभाजवळ उभे राहा. सुबत्तेच्या प्रकाशात आणि विपत्तीच्या औदासीन्यात त्यापाशी उभे राहा. त्रासात असता ख्रिस्ताच्या वधस्तंभाकडे जा, दुर्बल असता तंदुरुस्तीसाठी जा, धोक्यात असता त्याला जाऊन बिलगा, हिवाळ्यातला झोंबणारा थंड वारा तुमच्यावरून वाहू लागला असता त्याच्यामागे लपा. वधस्तंभाजवळ असताना तुम्ही पित्याच्या ऱ्हदयाशी, तारणाऱ्याच्या कुशीशी असता. जणू स्वर्गाच्या प्रवेशद्वाराच्या गौरवी कमानीखालीच उभे असल्यासारखे वाटते.

येशूच्या वधस्तंभापाशी येताच दुसरे काही नव्हे तर प्रीतीच तुमचे स्वागत करील — तुमच्या सर्व पापांची क्षमा करणारी प्रीती, तुमच्या सर्व अपात्रतेवरून वाहाते, तुमच्या सर्व जखमा बऱ्या करते, तुमच्या सर्व दु:खाचे सांत्वन करते, तिच्या आशीर्वादित डेऱ्यात पृथ्वी स्वर्गासाठी बदलून जाईपर्यंत तुम्हाला आसरा देते, आणि तुम्ही योद्ध्याची तलवार विजेत्याच्या तळहातावर ठेवता, मग वधस्तंभाच्या पायथ्यावरून सिंहासनाच्या पायथ्याशी झेप घेता, आणि सदासर्वदा प्रभूजवळ राहाता.

किती हे रिक्त होणे, नम्रता व मानहानी

ख्रिस्ताच्या गौरवावर वरचेवर भक्तिभावाने मनन करा. तुमच्या आत्म्याला प्रचंड वाढते फायदे होतील, मन सतत त्यात मग्न, भरलेले, विशाल राहील, आणि जगाच्या वाढत्या व सतत धोकेबाज असणाऱ्या अतिक्रमणाला सामर्थ्याने प्रतिकार करायला सामोरे जाण्यास तुम्ही सज्ज व्हाल. व्यर्थ विचारांना तेथे स्थान सापडणार नाही, दैहिक मौजमजेसाठी वेळ व इच्छाही राहणार नाही. अहाहा! वधस्तंभी खिळण्याचे व पवित्रीकरणाचे हे इम्मानुएलचे किती सुस्पष्ट व गौरवी चित्र! किती रिक्त, नम्र, व मानहानी करणारे! आपल्या पूर्वजांसोबत मग आपण घोषणा देतो, "मी स्वत: चा तिटकारा करीत

धूळ व राखेत बसून पश्चात्ताप करतो." आणि *संदेष्ट्यांबरोबर* म्हणतो, "हाय हाय! माझे आता वाईट झाले; कारण मी अशुद्ध ओठांचा मनुष्य आहे — आणि सेनाधीश परमेश्वर राजाधिराज ह्यास मी आपल्या डोळ्यांनी पाहिले." आणि *प्रेषिताबरोबर* म्हणू "आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या वधस्तंभाच्या अभिमानाशिवाय कशाचाही अभिमान बाळगणे माझ्या हातून न होवो; त्याच्याद्वारे जग मला व मी जगाला वधस्तंभावर खिळलेला आहे."

अहाहा! मग तुमचे अंतरंग मुक्तिदात्याच्या विशाल व व्यापक गौरवाच्या दृष्याने भरून जावे हे लक्ष्य ठेवा. आणि दैवी मनाचे व वैभवाचे जेवढे म्हणून लागलेले शोध तुम्हाला सामावून घेता येतील, ते तुमच्या विचारांचा एकच विषय होऊन जाऊ द्या — तुमच्या संवादाचा हाच एक मुद्दा असू द्या. ख्रिस्ताविषयीच्या तुमच्या ज्ञानाला मर्यादा घालू नका. ग्रंथाची फक्त प्रस्तावनाच वाचली आहे असा विचार करा. समुद्राच्या केवळ बाह्य किनाऱ्याला तुम्ही स्पर्श केला आहे असे समजा. थोडा ताण देऊन तुमच्या पलीकडील शोध न लागलेल्या सौंदर्याचा, मौल्यवान देखाव्यांचा, झळाळत्या गौरवाचा, प्रत्येक वाढत्या उत्तेजनाचा शोध घ्या, तुमच्या संशोधनाला निमंत्रण द्या, तुमच्या विश्वासाला श्रद्धा ठेवायला सांगा, तुमच्या प्रेमाला आदरांजली देऊ द्या आणि तुमच्या जीवनाचे समर्पण होऊ द्या.

तर मग पुढे कूच करा !! येशूच्या वाढत्या ज्ञानात जे गौरव अजून तुम्हाला प्रकट व्हायचे आहे, ते कोणत्या कल्पनेत उतरू शकेल, कोणत्या लेखणीतून ते वर्णन उतरू शकेल? येशू त्याच्या व्यक्तित्वाचे सर्व सौंदर्य खुले करायला व त्याच्या प्रीतीच्या डेऱ्यात तुम्हाला प्रवेश द्यायला सज्ज आहे. त्याच्या अंत:करणात एकही कोठडी अशी नाही की जी तो तुमच्यासाठी उघडणार नाही. तुमच्यावर वर्षाव झाला नाही असा एकही आशीर्वाद ठेवणार नाही. तुम्हाला दाखवले नाही असे एकही गौरव असणार नाही.

तुम्ही अजून कधी पाहिल्या नाहीत अशा महान गोष्टी तुम्ही पाहाल. तुमच्या पतित स्वभावातील पापाची प्रचंड गहनता तुम्हाला उघड होईल, प्रायश्चित्ताच्या रक्तामधील पापाच्या शुद्धीकरणाच्या गुणविशेषाच्या सामर्थ्याची तुम्हाला खोल संवेदना जाणवेल, या

प्रियाचा स्वीकार करण्यातील स्पष्टता तुम्हाला दिसेल, देवाच्या प्रीतीचे महान शोध लागतील, आणि तुम्ही येशूमधील महान कृपेच्या व गौरवाच्या गहनतेचा उपभोग घ्याल. तुमचा देवाशी निकटचा सुसंवाद होईल. आणि तुमच्या अंत:करणातील प्रीती फलद्रूप होईल. तुमचे पाय हरणाच्या पायांसारखे होतील आणि तुम्ही उच्चस्थानी बागडाल. तुमची शांती नदीप्रमाणे, व तुमची धार्मिकता समुद्राच्या लाटांप्रमाणे वाहील. दु:खाने तुम्ही इतके घायाळ होणार नाही, क्लेशांचा भार तुम्हाला फारसा दडपणार नाही, संकटे तुमच्यावर फार उत्सुकतेने परिणाम करणार नाहीत, ही सर्व आणि आणखीही अमर्याद गोष्टींचा परिणाम तुमच्या ख्रिस्ताच्या सखोल ज्ञानातून होईल.

जेव्हा त्याचे सौंदर्य दिसते

काय तारणारा आहे येशू! तो दहा हजारात खास आहे! त्याचे निष्पापत्व पाहा, पापरविरहित तरी तो वास्तव मानव आहे — आणि आपल्या विविध परिस्थितीत आपल्याला सहानुभूती देऊ शकतो आपली— संकटे, आपल्या परीक्षा, आपला अधर्म, आपली दु:खे असे काहीही असो. आता तो गौरवात आहे. तरीही तो बंधुप्रेमाचे ऱ्हदय राखून आहे, आपल्या विनंत्या ऐकायला तो वाकून आपले कान पुढे करतो, आपले उसासे झेलायला नेहमी जवळच उभा असतो. आपले अश्रू पुसण्यासाठी, आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी, त्याच्या मसलतीने आपल्याला मार्गदर्शन करण्यासाठी, आणि नंतर आपल्याला गौरवात स्वीकारण्यासाठी!

काय आहे हा तारणारा येशू! त्याची ओळख होताच, इतर सर्व व्यक्ती धूसर होतात. जेव्हा त्याचे सौंदर्य दृष्टीस पडते तेव्हा इतर सर्व सौंदर्य त्याच्यापुढे फिके पडते. जेव्हा त्याची प्रीती जाणवते, तेव्हा सर्व प्रेमापेक्षा तो उच्च स्थानी आसनस्थ होतो. त्याला अधिकाधिक ओळखावे हीच नवीकरण झालेल्या मनाची इच्छा बनते; आणि त्याची अधिकाधिक ओळख करून देणे हे ख्रिस्ती जीवनाचे उद्दिष्ट बनते. काय आहे हा तारणारा येशू!

तुमचा सर्वसमर्थ मित्र

येशू हा सर्वसमर्थ देव आहे म्हणून त्याच्या लोकांसाठी सर्वसमर्थ

भारवाहक आहे. आपण ओझ्याने भारलेले लोक आहोत. प्रत्येक विश्वासी व्यक्तीला आपापले विशिष्ट स्वतंत्र ओझे असते. अरे विश्वासी मनुष्या, तुझे ओझे तरी काय आहे? तुझ्या ठायी वसणारे पाप आहे का? दैहिक स्वभावानुसार काही अधर्म आहे का? मनोवृत्तीनुसार असणारी ती दुर्बलता आहे का? काही घरगुती परीक्षा आहे का? ती वैयक्तिक किंवा तुमच्याशी संबंधित आहे का? मालमत्तेची हानी झाली आहे का? आरोग्य ढासळत आहे का? जिवाला काही घोर लागला आहे का? बौद्धिक निराशा आली आहे का?

हे दडपलेल्या व भारावलेल्या विश्वासी व्यक्ती, ये. सर्वस्वाचा त्याग करून ये आणि बुडून जा. येशूकडे पाहा, तो सर्व समर्थ देव, तुझे ओझे स्वत:वर घेऊन तुला विसावा देईल. तू आपल्या दडपणाबद्दल संवेदनशील आहेस हे बरे आहे — तुला आपली दुर्बलता व अपूर्णता जाणवते — आणि तुझ्या स्वत:च्या सामर्थ्याच्या अंताशी तुला आणण्यात आले हे देखील चांगले आहे. आता तुझ्या सर्वसमर्थ मित्राकडे वळ, तो पृथ्वीच्या अंतापर्यंतचा निर्माता आहे — हा देव सनातन आहे, त्याला मूर्च्छा येत नाही की तो थकत भागतही नाही.

अरे पाहा! आपल्या कळपातील दुर्बल, कमकुवत आणि गलितगात्रांसाठी येशूमध्ये किती बळ आहे! तुम्ही कधीही शत्रुच्या कचाट्यात सापडाल, आणि विश्वासाचा लढा संपला असे तुम्हाला वाटत असेल. धीर धरा! येशू, तुमचा तारणारा, मित्र, बंधू, आणि सर्वसमर्थ देव आहे. तुमच्या अशक्तपणात त्याची शक्ती पूर्णत्वास जाईल. युद्ध तुमचे नाही, त्याचे आहे. येशू आपल्या दुर्बलतेत बल देतो, आपली ओझी वाहातो, आपल्या गरजा पुरवतो, आणि त्याच्या पराक्रमी ढालीने आपल्याला वेढतो. येशूची सर्वसमर्थता कष्टी, थकल्या भागल्या संताला दैवी सात्वनाचा केवढा बलशाली झरा आहे! तुमचे दु:ख किती गहन आहे, तुमच्या पीडा किती भारी आहेत, कोणा मानवाला निवारता येणार नाहीत इतक्या प्रचंड तुमच्या अडचणी आहेत. त्यांची तीव्रता, माणसाचे सामर्थ्य, आणि सहानुभूतीचे महत्त्व या सर्वच दूरच्या गोष्टी झाल्या.

या. तुम्ही वादळात हिंदकळले गेला आहात आणि तुमचे सांत्वन झालेले नाही. ज्यांचा आत्मा घायाळ झाला आहे असे भग्न ऱ्हदयाचे,

ज्यांची मने धुळीत लवली आहेत असे सर्व या. ख्रिस्ताच्या पराक्रमाच्या निवाऱ्याखाली थोडा वेळ लपा. तुमच्या कोणत्याही परिस्थितीसमोर येशू अजिबात कमी नाही. त्याची *ताकद* सर्वसमर्थ आहे. त्याची *प्रीती* सर्वसमर्थ आहे. त्याची *कृपा* सर्वसमर्थ आहे. त्याची *सहानुभूती* सर्वसमर्थ आहे, त्याचा *बाहू* सर्वसमर्थ आहे. त्याची *साधनसामग्री* विस्तृत, अति गहन, अमाप आहेत. आणि ही सर्वसमर्थता तुमच्या बाजूला आहे. ती तुम्हाला अग्नितून आणि जलांतून बाहेर काढील. तुमचा बचाव करणारा, सर्वसमर्थ असणारा, तुमचा बंधू व मित्र तुम्हाला सहानुभूती दाखवतो. त्याचा दैवी बाहु तुम्हाला वेढतो, आधार देतो आणि राखतो — त्याचा मानवी जीव तुमच्या कमजोरीच्या भावनेने भारावतो, त्याच्या हळूवार, तीव्र कळवळयाने तुमच्यासाठी आतुर राहतो.

अचंबित व स्तंभित करणारी प्रीती !

ख्रिस्ताचा वधस्तंभ आपल्या त्याच्यावरील प्रीतीला प्रेरणा देतो. पवित्र आत्म्याशिवाय वधस्तंभाच्या पायथ्याशी येऊनही त्याच्या प्रीतीची प्रेरणा न जाणवणे अशक्य आहे. येशूच्या अद्भूत, *अतुलनीय प्रीतीचा अंगिकारलेला* विश्वास, वधस्तंभावरून खाली लवून आपल्यावर टाकलेल्या त्याच्या क्षमाशील नजरेने आपली बर्फासारखी थंड अंत:करणे त्याच्या प्रीतीच्या तेजाने नक्कीच उबदार करील. येशू तुमच्यावर प्रीती करतो असा विश्वास धरा. त्याच्या बदल्यात तुमची अंत:करणे प्रीतीने उजळून निघतील हे तुमच्या स्वेच्छेने केलेल्या आज्ञापालनाने व काहीही राखून न ठेवता केलेल्या समर्पणाने, विश्वासूपणे केलेल्या सेवेने, धीराने सहन करण्याने, अच्छादन न ठेवता स्वर्गप्रेरित व स्वर्गाकडे झेपावणाऱ्या आपल्या प्रीतीच्या ज्वालेमध्ये भस्म होण्याने सिद्ध होईल. अचंबित करणारी आश्चर्यकारक प्रीती तुमच्या बदली मरण्यासाठी देवाने आपला पुत्र देण्यात प्रदर्शित झाली. या बंधनांनी तो तुमचे प्रेमळ अंत:करण आपणाजवळ ओढून घेईल.

त्याने तिच्यावर प्रीती केली म्हणून

येशू मंडळीशी असलेल्या त्याच्या विवाहसंबंधांपेक्षा दुसरे कोणतेही संबंध इतके अर्थपूर्ण रीतीने जपत नाही. युगारंभापूर्वीच त्याचे सर्वकाळासाठी तिच्याशी वाग्दान झाले आहे. पित्याजवळ त्याने तिचा

हात मागितला — आणि पित्याने ती त्याला देऊन टाकली. ती त्याची होणार याविषयी त्याने कराराही करून टाकला. त्या कराराच्या अटी फार भारी होत्या. पण त्याच्या पुत्राला त्या पूर्ण करणे फार अवघड नव्हते. त्या अटी अशा होत्या की, तिचा स्वभाव त्याने गृहीत धरायचा होता, तिच्या कायदेशीर बंधनातून तिला मुक्त करायचे होते, तिची शिक्षा सहन करायची होती, तिचे सर्व धुळीस मिळालेले दुरुस्त करायचे होते आणि तिला गौरवी असे सादर करायचे होते! त्याने हे सर्व हाती घेतले व सिद्धीस नेले, *कारण त्याची तिच्यावर प्रीती होती!* येशूची मंडळीवरील प्रीती ही अत्यंत मृदू पतिची प्रीती आहे. ती एकमेव, सातत्याची, ओथंबलेली, अप्रतिम, व अद्भुत अशी आहे. येशू तिला अत्यंत सहानुभूती दाखवतो, तिचे पोषण करतो, तिला पुरवठा करतो, वस्त्रे पांघरतो, तिच्यावर पहारा ठेवतो आणि तिच्यावर अत्यंत घनिष्ठ हळुवार प्रेमाचा वर्षाव करून तिचे लाड करतो.

येशूच्या उराशी

हे ख्रिस्तावरील विश्वासी व्यक्ती, जीवन यात्रेच्या दुसऱ्या एका स्तरावरील सकटांना आणि कर्तव्यांना सामोरे जा. येशू त्या सर्वांसाठी पुरेसा आहे. त्या सर्वांमध्ये येशू तुझ्या सोबत असेल. त्या सर्वांमधून येशू तुला विजयाने पद्धतशीर पार नेईल. तू धन्यवादित आहेस. लवकरच येशूला प्रत्यक्ष पाहण्याची सतत अपेक्षा बाळगत जीवन जग. ज्याने खाली या भूतलावर तुझ्या ख्रिस्ती यात्रेकरूच्या प्रवासातील अनेक थकल्या पावलांना उत्तेजित केले, सांत्वन देऊन तुझी वाटचाल गोड केली त्याच्याशी बोलत राहा. तो क्षण वेगाने येत आहे. थोड्याच वेळात त्या जखमा आणि अस्वस्थता, मोह आणि प्रदूषणे लाटांवरील फेसाप्रमाणे नाहीशी होतील, आणि सर्वकाळाकरता तू येशूच्या उराशी विसावशील.

त्याच्या प्रीतीचे एकच एक उद्दिष्ट

आपण संपूर्ण जमावापासून निवृत्ती घेऊन वैयक्तिकपणे देवाशी व्यवहार करू लागणे ही अत्यंत महान दया आहे — जेव्हा आपण ती अभिवचने वैयक्तिकरित्या आपलीशी करतो, जेव्हा वैयक्तिक पापे, अधर्म, दु:खे, भावना येशूकडे नेऊन टाकतो तेव्हा त्याची नजर तो आपल्यावर झुकवतो, त्याचे कान आपल्या दिशेने लवतात, त्याचे

हात आपल्यासाठी सरसावतात, त्याचे अंत:करण आपल्याला इतके आत्मसात करते की जणू इतर कोणा संकटग्रस्ताने त्याला कधी कसली विनंती किंवा आर्जव केले नाही व आपले दु:ख उघड केले नाही. थोडक्यात सांगायचे तर जणू त्याच्या प्रीतीचे केवळ आपणच एकमेव उद्दिष्ट होतो.

त्याचे तुम्हाला आमंत्रण आहे की "माझ्याकडे या." तुम्ही त्याच्याकडे गेल्यास त्याला आवडेल. त्याच्याशी आपले वैयक्तिक नाते असल्याचे जाणून घेण्यापेक्षा, त्याच्यासमोर आपली व्यक्तिगत स्थिती उघड करण्यापेक्षा, आपल्या व्यक्तिगत पापांची वैयक्तिक कबुली देण्यापेक्षा, आणि आपले अधर्म, पतन व दु:खावरील अच्छादन दूर करण्यापेक्षा इतर कशानेही तुम्ही त्याला सन्मानित करू शकत नाही.

ख्रिस्तच सर्वस्व असायला हवा

सर्वांना वगळून केवळ येशूवर आपण आपली नजर तत्परतेने खिळवून ठेवणे आपल्याला शक्य होत नाही. संपूर्ण तारण *त्याच्यामध्ये* आहे. संपूर्ण तारण *त्याच्यामधून* निघते. संपूर्ण तारण *त्याच्याकडे* घेऊन जाते. आणि आपल्या तारणाची खात्री व समाधानासाठी विश्वासाने आपल्याला त्याच्यावरच पूर्णपणे विसावावे लागते. ख्रिस्तच सर्वस्व असायला हवा. ख्रिस्तच आरंभ — ख्रिस्तच केंद्र — आणि ख्रिस्तच शेवट. जे तुम्ही आपले दारिद्र्य, अत्यंत वाईटपणा, अपूर्णता व त्यामुळे दहा हजारांनी होणाऱ्या चुका, ज्याची कोणी दखल घेणार नाही पण तुमचा आत्मा व देव दखल घेणार यासंबंधी तुम्ही सुज्ञ आहात हेच तुमच्यासाठी गोड सत्य आहे. यापासून फिरून ख्रिस्तावर विसावायचे — हो! *परिपूर्ण ख्रिस्त, प्रेमळ ख्रिस्त, मृदू ख्रिस्त* — ज्याच्या अंत:करणातील प्रीती कधी थंडावत नाही, ज्याच्या नजरेतून कधी खरडपट्टीची गरळ ओकली जात नाही, ज्याच्या ओठांतून दोषारोपाच्या शिक्षेचे फर्मान सुटत नाही! ख्रिस्तच सर्वस्व असायला हवा!

तो मित्र

"असा मित्र असतो की तो आपल्याला बंधूपेक्षाही आपल्याला धरून राहतो." — नीति १८:२४

जर अंत:करण ख्रिस्ताकडे वळाले तर मानवी सहानुभूतीचे सामर्थ्य मोठे आश्चर्यकारक आहे. जर ते दुर्बल असले तर ते फक्त स्व:त:कडेच नेत राहाते. आपल्या रोगग्रस्त मनाची व्यवस्था राखण्यास, भग्न ऱ्हदयाला आरोग्य द्यायला, अशक्त हातांना बळ द्यायला, आणि लटपटणारे गुडघे स्थिर करायला आपण किती दुर्बल व अपुरे आहोत! आपली मूक सहानुभूती, आपली प्रार्थनाशील शांतता आपल्या प्रेमाचे उत्तम स्पष्टीकरण देते, आणि ही आपली मदत अत्यंत परिणामकारक असते.

पण जर आपल्या चिंतेचा विषय हाती धरून देवाकडे नेला —– त्याची येशूला व्यवस्था लावायला दिली, त्या विषयाला त्याच्या प्रीतीचे दर्शन घडवले, त्याच्या परिपूर्ण प्रायश्चित्ताचे चित्र दाखवले, त्याची पुरी असलेली कृपा, त्याची क्षमा करण्यातील तत्परता, त्याचे तारण्याचे सामर्थ्य, त्याच्या स्वभावातील उत्कृष्ट संवेदनशीलता, आणि अशा प्रकारची मानवी दु:खासाठी असलेली त्याची परिपूर्ण सहानुभूती दाखवली —– तर मग अत्यंत प्रभावीपणे व खऱ्या अर्थाने दु:ख शमेल, घाय बरे होतील, आणि प्रभूमध्ये हस्त बळकट होतील.

ख्रिस्तासारखी सहानुभूती नाही, प्रीती नाही, सौम्यता नाही, हळुवारपणा नाही, धीर नाही! येशू सहानुभूतीपूर्वक माझ्या, संकटांत, माझ्या परीक्षांत, माझ्या मोहात, माझ्या दु:खात, माझ्या आनंदात प्रवेश करतो ही किती मधुर, किती चेतनादायी गोष्ट आहे! हे सत्य आपल्या जीवाला अत्यंत प्रिय वाटू दे! आपले संपूर्ण अंत:करण त्या अत्यंत पवित्र आणि मोलवान मैत्रीवरील निष्ठेने व निकटच्या विश्वासाने त्याच्यापुढे खुले करण्यास भाग पडू दे. त्याच्या दृष्टीने त्याला संतुष्ट करणाऱ्या गोष्टीच करण्याची आपली उत्कट इच्छा असू दे .

प्रियांनो, हे कधीही विसरू नका —– जसे गीताचा प्रतिध्वनी कधी पुरता नष्ट होत नाही त्याप्रमाणे तुमच्या कानात हे शब्द सतत घुमत राहू देत —– तुमच्या सर्व दु:खात, तुमच्या सर्व संकटात, तुमच्या सर्व गरजांच्या वेळी, तुमच्या विवेकाच्या भटकंतीत, तुमच्यावरील सर्व हल्ल्यात, जीवनात, मरणात, आणि न्यायाच्या दिवशी —– तुमच्या जवळ बंधूपेक्षाही सतत निकट राहाणारा मित्र आहे ! तो मित्र आहे

येशू!

जणू असे कधी घडलेच नाही
प्रियांनो, लवकरच , खरेच अगदी लवकर! ज्या सर्व चिंतांनी ऱ्हदय भारावले जाते, आणि दु:खाने पिळवटून निघते — ज्यामुळे डोळयांत अश्रू येऊन सारे अंधुक होऊन जाते, दिवसाच्या चिंता आणि रात्रीची जागरणे होतात, हे सारे जणू कधी घडलेच नव्हते असे होईल! गुंतागुंतीतून उद्भवलेले, खिन्नता, एकाकीपणा, अरण्यातील मोह यांमधून तुम्ही आपल्या सार्वकालिक विसाव्यामध्ये जाल. जिथे तुमचे न कोमेजणारे वारसत्व असेल, जिथे दु:ख नाही, जिथे फाटाफूट नाही, पाप नाही, सूर्यास्त नाही, संधिप्रकाश नाही, संध्याछाया नाही, मध्यरात्रीचा अंधकार नाही — तर सर्व परिपूर्ण, निरभ्र , सार्वकालिक दिवस असेल, कारण तेथे असेल येशूचा आनंद, प्रकाश आणि गौरव!

स्वर्ग आहे तरी काय?
प्रियांनो , स्वर्ग आहे तरी काय? पवित्र जनांचे अंतिम गौरव तरी कसे असणार? हे उत्तम स्थळ नाही का? पित्याने आपल्या लोकांना त्या स्थळी आपल्या पुत्राद्वारे खंडणी भरून गौरवाने घरी आणणे नाही का? स्वर्ग ही देवाने रचना केलेली जागा आहे. त्याच्या प्रिय पुत्राने पवित्र रक्ताने खंडून घेतलेल्या मंडळीसाठी देवाने निवडलेली व प्रतिष्ठापना केलेली जागा आहे. आपण जेव्हा तेथे प्रवेश करू तेव्हा पित्याच्या घरी मुलांचे स्वागत व्हावे तसा आपला तेथे प्रवेश होईल. देव जे उत्तम देऊ शकतो तसे ते असेल. त्याच्या सामर्थ्याने जे म्हणून तो वर्षू शकतो त्या सर्वांचा तो आपल्यासारख्या अपात्रांवर वर्षाव करील — *उत्तम तारक, उत्तम झगा, उत्तम मेजवानी, उत्तम वतन.*

नवीन स्वर्गात व नवीन पृथ्वीवर कलंक लागण्यासारखे काहीच नसेल. काळोखी फासणारे काहीच नसेल, कटू करणारे काहीच नसेल, घाय करणारे काहीच नसेल — फसवणूक करणारा सर्प नसेल, पाशात अडकणारी हव्वा नसेल, नाश करायला बिघडवणारा नसेल, भ्रष्ट करायला पाप नसेल, दु:खी करायला पाप नसेल, मैत्री तोडणारे गैरसमज नसतील, अपकीर्ती करणारी जीभ नसेल, गोठवणारी शंका नसेल, अश्रू नसतील, आजार नसतील, मरण नसेल, फारकत नसेल.

देव आपल्या लोकांना देईल असे ते शुद्ध, तेजस्वी, गौरवी विश्वाचे उत्तम क्षेत्र असेल! त्या परात्पर देवाचे हे संत!

ह्या भवितव्याने आपल्यात चैतन्य येऊ द्या. तुमचे पवित्रीकरण होऊन तुम्हाला सांत्वन मिळू द्या! इथे या भूतलावर तुम्हाला फार काळ परिश्रम करून लढा द्यायचा नाहीये. येथे अगदी अल्पकाळ तुम्हाला या गोलार्धात संघर्ष, संकटे दु:खांशी सामना करीत राहायचे आहे. समय येत आहे. किती वेगाने दिवस जात आहेत! *लवकरच प्रभू येशू ख्रिस्त तुम्हाला स्वर्गीय घरी घेऊन जाईल!*